




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ

# गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ०१७ | किंमत : ४.०० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com





# एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होणार?



मुंबई : (समर्थ गांवकरी)

शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप यांच्यातील संबंध अलीकडे ताणले गेले असतानाच, शिवसेनेचे मंत्री दादा भुसे यांनी एकनाथ शिंदे यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याने राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. नंदुरबारमधील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या प्रचार सभेत बोलताना भुसे म्हणाले, "आजही लोकांच्या मनात एकनाथ शिंदेच मुख्यमंत्री आहेत. आणि नियती असेल, तर महाराष्ट्र पुन्हा त्यांच्याच नेतृत्वाखालील दिसेल." भुसे यांच्या मते, शिंदे हे असे मुख्यमंत्री होते जे रात्रभर लोकांना भेटून त्यांच्या अडचणी ऐकायचे आणि दिवसातून तब्बल 20–22 तास काम करायचे. भुसे यांनी पुढे सांगितले की, "महाराष्ट्राने असा मुख्यमंत्री कधीच पाहिला नव्हता. उपमुख्यमंत्री अजित पवार देखील शिंदे यांच्या कामाची प्रशंसा करतात." लोकांच्या अपेक्षा आणि शिंदेंच्या प्रशासकीय शैलीमुळे ते पुन्हा राज्याचे नेतृत्व करू शकतात, असा त्यांनी दावा केला आहे. स्थानिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि शिंदे गटामध्ये नेत्यांना एकमेकांच्या पक्षात घेण्यावरून तणाव निर्माण झाला आहे. हा तणाव शिगेला पोहोचवणारे विधान म्हणजे, भाजपचे आमदार तानाजी मुटकुळे यांनी शिंदे गटाच्या आमदारावर केलेले गंभीर आरोप. मुटकुळे यांनी दावा केला की "कळमनुरीचे शिवसेना आमदार संतोष बांगर यांनी 2022 मध्ये ठाकरे गट सोडून शिंदे गटात जाण्यासाठी 50 कोटी रुपये घेतले." मुटकुळे म्हणाले की बांगर यांनी सुरुवातीला ठाकरे गट सोडणार नसल्याचे सांगितले, पण रातोरात भूमिका बदलली.

### भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडून 'संयम' पाळण्याचा सल्ला

राजकीय तणाव वाढू नये म्हणून भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने महाराष्ट्रातील नेत्यांना संयम राखण्याच्या सूचना दिल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. मुंबई महानगरपालिका निवडणुकांची घोषणा होईपर्यंत भाजपने "शांत राहून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवावे" असा सल्ला देण्यात आला आहे.

## थोडक्यात...



### बिबट्याला आवरण्यासाठी चार जंगलांची निर्मिती

पुणे (समर्थ गांवकरी) : शहरात वारंवार येणाऱ्या बिबट्यांना आवरण्यासाठी वनविभागाच्या वतीने जिल्ह्यात चार ठिकाणी जंगलांची निर्मिती करण्यात येत आहे. शिरूर तालुक्यात पिंपरखेड व न्हावरा येथे तसेच जुन्नर व मंचरमध्ये ही चार जंगले तयार होणार आहेत. त्यासाठी जागा तयार आहे, त्याचा प्रस्तावही तयार आहे, त्यावर आता सरकारी मंजुरीच्या शिक्कामोर्तबाची वनखात्याला प्रतीक्षा आहे. बिबट्यांना हा अधिवास मिळाला की त्यांचे शहरात प्रवेश करणे कमी होईल, असा दावा वनविभागातील ज्येष्ठ अधिकाऱ्यांनी केला आहे. या चारही ठिकाणी वनविभागाची बरीच मोठी मोकळी जागा आहे. बिबटप्रवण क्षेत्रातच या जागा निवडण्यात आल्या आहेत. 30 ते 50 एकर असे त्यांचे क्षेत्र आहे.

### आधारकार्डवर दिलेले जन्म-मृत्यूचे दाखले होणार रद्द

मुंबई (समर्थ गांवकरी) :केवळ आधारकार्डच्या पुराव्यावर दिलेले किंवा संशयास्पद वाटणारे जन्म-मृत्यूचे दाखले आणि नोंदी तत्काळ रद्द करून, पोलिसात तातडीने तक्रार दाखल करण्याचे करण्याचे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. महसूल विभागाने याबाबतचे परिपत्रक गुरुवारी जारी केले. तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांना सोळा मुद्यांच्या आधारे जन्म-मृत्यू दाखल्यांची तपासणी करण्यात येणार आहे.

# महाराष्ट्राच्या निवडणुकांचे भवितव्य आज ठरणार

### आरक्षण मर्यादा ५०% च्या वर : जिल्हा परिषद- पंचायत समिती निवडणुकीवर प्रश्नचिन्ह

मुंबई : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर ओबीसी आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा दिल्लीतील सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. आज या प्रकरणी महत्त्वाची सुनावणी होणार असून, राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे भवितव्य त्यावर ठरणार आहे. सध्या राज्यात नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका रंगात आल्या आहेत. 246 नगरपालिका आणि 42 नगरपंचायतींमध्ये उमेदवारी अर्ज दाखल झाले असून, अनेक ठिकाणी थेट लढती रंगल्या आहेत. अशा पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचे आजचे मत राज्याच्या राजकीय वातावरणावर मोठा परिणाम घडवू शकते.



मंगळवारी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकांना स्थगिती देण्यास स्पष्ट नकार दिला. मात्र, राज्य निवडणूक आयोगानेही कोर्टात कबुली दिली की 40 नगरपरिषद व 17 नगरपंचायतींमध्ये 50% आरक्षणाची मर्यादा ओलांडली आहे. त्यामुळे संतुलित आरक्षण रचनेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

संविधानात आरक्षणाची कमाल मर्यादा 50% निश्चित असल्याने, आयोगाकडून केलेल्या अद्ययावत अहवालानंतर कोर्टाचे आदेश निवडणूक प्रक्रियेला वळण देऊ शकतात. या याचिकेवर विकास गवळी यांनी न्यायालयात आक्षेप नोंदवला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, राज्य सरकारने काही ठिकाणी ओबीसी व इतर घटकांना जास्त प्रमाणात आरक्षण देत घटनात्मक रेषा ओलांडली आहे. दुसरीकडे, राज्य सरकार मात्र बांठिया आयोगाचा अहवाल दाखवत आपण कायद्याच्या चौकटीत राहूनच आरक्षण निश्चित केले असल्याचा दावा करत आहे. या दोन बाजूंच्या युक्तिवादावर न्यायालय आता कोणता निर्णय देते, हे महत्त्वाचे ठरणार आहे. मंगळवारीच्या सुनावणीत सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी राज्याला अधिक वेळ देण्याची विनंती केली. त्यावर याचिकाकर्त्यांनी जोरदार आक्षेप घेतला की, निवडणुका जाहीर झाल्या आहेत, अर्ज भरून झाले आहेत आणि आता वेळ कशासाठी? कोर्टाने कोणतेही मत नोंदवण्याचे टाळले मात्र, अंतिम आदेशाच्याच चौकटीत निवडणुका होतील, अशी टिप्पणी केली. त्यामुळे आज सुनावणी ठेवण्यात आली आहे.

आजचा निकाल म्हणजे भविष्यातील आरक्षण रचनेचा मार्गदर्शक ठरू शकतो. सध्या निवडणूक प्रचार जोमात असताना, अचानक न्यायालयीन मुद्दा वाढल्याने राजकीय नेत्यांचे लक्षही न्यायालयात काय घडते, याकडेच लागले आहे. जर कोर्टाने आरक्षण रचनेबाबत फेरबदलाचे आदेश दिले तर अनेक ठिकाणी उमेदवारीच बदलण्याची शक्यता निर्माण होईल.

# मुंबईचं नाव बदलण्याचा डाव? राज ठाकरे यांचा केंद्रावर थेट निशाणा

मुंबई : (समर्थ गांवकरी)

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांच्या अलीकडील वक्तव्यावर जोरदार टीका करत केंद्र सरकारवर मोठा आरोप केला आहे. जितेंद्र सिंग यांनी मुंबईतील आयआयटी कार्यक्रमात "IIT Bombay चं नाव बदलून IIT Mumbai न केल्यानं चांगलं झालं" असं विधान केलं होतं. या वक्तव्यावर राज ठाकरे यांनी फेसबुकवरून थेट प्रहार केला.

राज ठाकरे म्हणतात, "हे विधान एखाद्या व्यक्तीचं नसून सरकारच्या मानसिकतेचं प्रतीक आहे." त्यांच्या मते, मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळं करण्याचा प्रयत्न दशकांपूर्वीही झाला होता; तो मराठी माणसाने परतवून लावला. मात्र, केंद्रात आता त्याच प्रकरणाला पुन्हा



हवा दिली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. आपल्या पोस्टमध्ये राज ठाकरे पुढे म्हणतात की, मुंबईचं नाव 'मुंबई' हे मूळ मुंबादेवीच्या नावावरून पडलेलं आहे. "म्हणूनच हे नाव काही लोकांना खटकतं," असा दावा त्यांनी केला. ते पुढे मराठी जनतेला आवाहन करत म्हणतात, "एमएमआर परिसरात राहणाऱ्या सर्व मराठी लोकांनी आता तरी जागं व्हायला हवं. मुंबई आणि मराठी माणूस यांना वेगळं करण्याचा प्रयत्न निश्चित सुरू आहे."

# आपलं चिन्ह कमळ, घड्याळाची वेळ आता चांगली नाही

सातारा : (समर्थ गांवकरी)

सातारा जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत आहे. प्रत्येक पक्ष आपापल्या ताकदीने मैदानात उतरला आहे आणि मतदारांना आकर्षित करण्यासाठी जोरदार प्रचार सुरू आहे. अशातच रहिमतपूर नगरपालिकेतील सभेत राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसवर जोरदार टीकास्त्र सोडले. आपलं चिन्ह कमळ आहे... घड्याळाची वेळ आता चांगली नाही, अशा टिप्पणीमुळे सभेचे वातावरण आणखी रंगले. मतदारांनी भ्रमात न राहता भाजपवर विश्वास ठेवावा, असा ठाम संदेश त्यांनी दिला. शिवेंद्रराजे म्हणाले, की आता इकडे-तिकडे पाहू नका. हातातील घड्याळ आणि चिन्हावरील



घड्याळ वेगळे आहे. कमळ चिन्हाचा आधार घ्या. विकास करणारे, स्थिर नेतृत्व देणारे उमेदवार निवडून द्या. त्यांच्या या वक्तव्यावर जनसमुदायातून मोठा प्रतिसाद मिळाला. गेल्या काही काळात राजकीय पक्षांतील बदल, फुट, चिन्ह वाद या सर्व चर्चांना चांगलाच उत आला असताना शिवेंद्रराजेंची ही टीका महत्त्वाची ठरली आहे.

# वर्षभरात प्रकृतीशी झुंज देत काम केले : धनंजय मुंडे

बीड : (समर्थ गांवकरी)

परळीतील विकासकामांवर आणि जनतेशी असलेल्या नात्यावर पुन्हा एकदा भर देत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार व माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी भावनिक भाषण केले. विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या जनसमर्थनाचा उल्लेख करताना ते म्हणाले की, मला वाटलं नव्हतं की निवडणुकीनंतर इथे पुन्हा अशी सभा घ्यावी लागेल. पण तुम्ही दिलेलं प्रेम इतकं मोठं आहे की सात जन्म घेतले तरी तुमचं ऋण फेडू शकणार नाही. यावेळी खासदार बजरंग सोनावणे यांनी केलेल्या टीकांना त्यांनी तिखट शब्दांत उत्तर दिलं. खासदारांचं काम तुतारी वाजवणं हे असतं, ते तेवढंच करत आहेत. माझ्या कामामुळे कोणाचं पोट दुखतंय, तर त्याबद्दल मी काय करणार? असा पलटवार त्यांनी केला.

मुंडे यांनी आपल्या कामाचा परिघ मराठवाड्यात कसा वाढला, याची विस्तृत उदाहरणांसह चर्चा केली.



पाणीपुरवठा योजना, लाडकी बहीण योजना, निराधारांना मदत, हे सर्व प्राधान्याने राबवल्याचं ते म्हणाले. गेल्या पाच वर्षांत मराठवाड्यात सर्वाधिक घरकुल आम्ही दिली. या भागात रेल्वेचं मोठं काम केलं. माझ्या हातांनी जे केलं ते लोकांसाठीच केलं. वैद्यनाथ मंदिरासंबंधी आणि काही व्यक्तींमुळे आपल्या वैयक्तिक आयुष्यात झालेल्या त्रासाचीही त्यांनी आठवण करून दिली. ज्यांनी माझं घर उद्ध्वस्त केलं, त्यांनी माझं मन मात्र तोडू शकलं नाही. जनतेनं मला धरून ठेवलं. असेही मुंडे म्हणाले.

गेल्या वर्षभरात स्वतःच्या प्रकृतीशी झुंज देत काम केल्याचा उल्लेख त्यांनी भावूक होत केला. दोन वेळा मी मृत्यूच्या सावलीतून बाहेर आलो. पण परळीकरांनी माझा हात सोडला नाही. म्हणून आज मी तुमच्यासमोर उभा आहे. शहराची बदनामी होत असल्याचे आरोप त्यांनी विरोधकांवर ठेवले आणि त्या प्रचाराला मतदानातून उत्तर द्या, असं आवाहन केलं. परळीकरांची शान कुणी कमी दाखवण्याचा प्रयत्न करत असेल तर ते तुम्ही सहन करणार नाही, हे दाखवण्याची वेळ आली आहे. असा संदेश त्यांनी जनतेला दिला.

धनंजय मुंडे यांनी आपल्या कामाबद्दल समाजातील सर्व घटकांकडून मिळालेल्या आदराची आठवणही करून दिली. माझ्यावर इथल्या प्रत्येक जाती-धर्माच्या माणसाचं प्रेम आहे. मी कधीच जातीय राजकारण केलं नाही. माझ्याकडे मदतीसाठी जो आला, त्याला रिकाम्या हाताने परत पाठवलेलं नाही. असे त्यांनी सांगितले.

### कोई तुतारी नही... कोई पंजा नही... फक्त घडी, घडी, घडी

सभेच्या शेवटास त्यांनी पुन्हा एकदा भावनिक होऊन लोकांशी संवाद साधत, माझ्याकडून काही चूक झाली असेल, तर मला शिक्षा द्या, पण परळीच्या विकासाला थांबू देऊ नका. माझं हृदय, माझा जीव, माझी सत्ता, माझी ताकद, सगळं काही तुमच्यासाठी आहे. कोई तुतारी नाही... कोई पंजा नाही... फक्त घडी, घडी, घडी, अशा शब्दांत त्यांनी पक्षाबद्दलचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवला. आगामी निवडणुकांसाठी ही सभा परळीतील राजकारणात ऊर्जा आणणारी ठरली असून, जनतेच्या पुढील प्रतिसादाकडे राज्याचं लक्ष लागलं आहे.

# बारा मंदिराचे गाव म्हणून आनंदगावची ओळख कायम

### पाणी फाउंडेशनच्या चळवळीत गावकऱ्यांनी दिले योगदान, गावातील खंडोबाच्या यात्रेला विशेष महत्व

केज : (समर्थ गांवकरी)

केज तालुक्यातील आनंदगाव (सा.) येथील खंडोबाचे मंदिर प्रसिद्ध असून हे ग्रामदैवत आहे. तर गावात इतर ही मंदिरे असल्याने या गावाची बारा मंदिरांचे गाव म्हणून तालुक्यात ओळख आहे. गावकऱ्यांनी वॉटर कप स्पर्धेत सहभागी होऊन पाणी फाउंडेशनच्या चळवळीत योगदान दिले होते. तर हे गाव हागणदारी मुक्त असून गावातील शाळा ही ई-लर्निंग आहे. केज तालुक्यातील आनंदगाव (सा.) हे २०२० लोक संख्येचे गाव असून ४१८ कुटुंबे आहेत. बहुतांश कुटुंबांचा शेती हा मुख्य



व्यवसाय असून गावकऱ्यांची खंडोबा देवावर मोठी श्रद्धा आहे. म्हणून खंडोबा हे ग्रामदैवत असून गावात मोठे मंदिर आहे. मंदिरात खंडोबाची पंचधातूंची मूर्ती असून दरवर्षी चंपाषष्ठी यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यात्रा महोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा आयोजित केल्या जात असून शेतकरी व पशुपालकांसाठी प्रदर्शन, शिवाय कुस्त्याची दंगल ही रंगते. त्यामुळे यात्रेला महत्व प्राप्त झाले असून यात्रेला गावकऱ्यांसह बाहेरून येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असते. खंडोबा मंदिरांसह हनुमान मंदिर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर, आनंतेश्वर मंदिर, नरसुबा मंदिर, बिरुबा मंदिर, गणपती मंदिर, येडाई मंदिर, तुळजाई मंदिर ही प्रमुख मंदिरे आहेत. तर गोपाळपूरा मठ असून या मठात ही आठ मंदिरे आहेत. त्यामुळे बारा मंदिर असलेले गाव म्हणून या गावाची तालुक्यात वेगळी ओळख आहे. गावकऱ्यांनी जिल्हा परिषद शाळेतील मुलांच्या गुणवत्ता वाढावी, त्यांना दर्जेदार व डिजिटल शिक्षण मिळावे, म्हणून लोकसभागातून शाळेला मदत करीत शाळा ई-लर्निंग केली आहे.

# वऱ्हाडी भाषेचा स्तंभ ढासळला : सुप्रसिद्ध कवी, हास्यसम्राट डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचे निधन

अमरावती : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी ,हास्यसम्राट, 'मिर्झा एक्सप्रेस'फेम डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचे आज 28 नोव्हेंबर रोजी सकाळी 6.30 वाजता प्रदीर्घ आजाराने निधन झाले. ते 68 वर्षांचे होते. यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यातील धनज - माणिकवाडा हे त्यांचे मूळ गाव आहे. सध्या अमरावती येथील वलगाव रोडवरील नवसारी परिसरात 'मिर्झा एक्सप्रेस' या घरात त्यांचे वास्तव्य होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी फातेमा मिर्झा, अभियंता मुलगा रमीज, महाजबी व हुमा या दोन सुविद्य कन्या आहेत. त्यांच्यावर अमरावती येथील ईदगा कब्रस्तानात दुपारी दोन नंतर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिलेले डॉ. मिर्झा रफी अहमद



बेग आपल्या खुमासदार सादरीकरणासाठी संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध होते. त्यांचे एकूण २० काव्यसंग्रह असून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात त्यांनी आपल्या 'मिर्झा एक्सप्रेस' या काव्य मैफिलीचे ६ हजारावर सादरीकरण केले आहे. गेल्या काही दिवसापासून मूत्रपिंडाच्या आजाराने ते त्रस्त होते. त्यांच्यावर अमरावती येथे त्यांच्यावर उपचार सुरू होते. वयाच्या 11 व्या वर्षापासून त्यांनी कविता लेखनाला सुरुवात केली होती. 17 सप्टेंबर 1957 रोजी त्यांचा जन्म झाला. त्यानंतर 1970 पासून त्यांनी मंचावर कविता सादर करायला सुरुवात केली. पुढील 50 वर्ष विदर्भ, मराठवाड्यातील कवी संमेलनाचे ते केंद्रबिंदू ठरले. वृत्तपत्रातील विविध स्तंभातून लेखनही त्यांनी केले. त्यांचा 'मिर्झाजी कहीन' हा स्तंभ तुफान लोकप्रिय ठरला होता.

त्यांचे २० काव्यसंग्रह असून मिर्झा एक्सप्रेस या नावाने अफलातून किस्से आणि कवितेचा कार्यक्रम प्रसिद्ध होता. शेती, माती, कृषी, शेतकऱ्यांच्या समस्या, ग्रामीण भागातील समस्या, आणि सामाजिक समस्यांवर व राजकीय विरोधाभासावर नर्म विनोदी शैलीमध्ये लिखाण करणे ही त्यांची खास हातोटी होती.



# जेजुरी गडावर चंपाषष्ठीची भक्तिमय सांगता

## २ हजार किलो भरीताचा नैवेद्य आणि ५० हजार भाविकांना महाप्रसाद!

**जेजुरी : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राच्या कुलदैवत खंडोबा देवाच्या चंपाषष्ठी उत्सवाची भव्य सांगता बुधवारी (दि. २६) जेजुरी गडावर मोठ्या भक्तिभावात पार पडली. तब्बल २ हजार किलो वांग्याचे भरीत, हजारो बाजरीच्या भाकऱ्या, पुरणपोळी आणि मिष्टान्नाचा नैवेद्य खंडोबाला दाखवून सहा दिवस चाललेल्या उत्सवाची सांगता करण्यात आली. या प्रसंगी ५० हजारांहून अधिक भाविकांवर महाप्रसादाची उधळण झाली.

मार्गशीर्ष प्रतिपदेला करवीर पीठाचे शंकराचार्य श्री नृसिंह भारती यांच्या हस्ते उत्सवमूर्तींची विधिवत घटस्थापना झाल्यानंतर सहा दिवस जेजुरी मल्हारमय झाली होती.

या काळात, पूजा-अभिषेक, देवदीपावली, तेलहंडा, देवाला तेलवण-हळद, वाघ्या–मुरळी आणि लोककलावंतांची भक्तिगीते, घडशी समाजाचे सुमंगल सनई–चौघडावादन अशा विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी गड दुमदुमला. बुधवारी सकाळी महापूजा-अभिषेकानंतर पुजारी व विश्वस्तांच्या उपस्थितीत उत्सवमूर्तींवर दुग्धाभिषेक करण्यात आला. त्यानंतर उत्सवमूर्तींची रंगमहालातून मुख्य मंदिराकडे मिरवणूक काढण्यात आली. वांग्याचे भरीत, बाजरीचा रोडगा व पुरणपोळीचा महाप्रसाद दाखवून सहा दिवसांच्या उपासनांची सांगता झाली.

जेजुरी देवसंस्थान आणि जय मल्हार चंपाषष्ठी अन्नछत्र प्रतिष्ठान यांच्या वतीने तयार करण्यात आलेला महाप्रसाद भाविकांसाठी मोठे आकर्षण ठरला. दोन हजार किलो भरीत, हजारो भाकरी व मिष्टान्नाचा प्रसाद मोठ्या उत्साहात वाटप करण्यात आला.

पहाटेपासूनच मानकरी व ग्रामस्थांच्या पूजा-अभिषेकाला सुरुवात झाली होती. कुलदैवताचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांनी गडावर मोठी गर्दी केली. दिवसभर "यळकोट यळकोट जय मल्हार"च्या जयघोषाने परिसर दुमदुमला.

उत्सव यशस्वी करण्यासाठी विश्वस्त व पुजारी सेवकवर्गाने उत्कृष्ट नियोजन केले.

यामध्ये, मंगेश घोणे, डॉ. राजेंद्र खेडेकर, अॅड. पांडुरंग थोरवे, पोपट खोमणे, विश्वास पानसे, अभिजित देवकाते, आशिष बाठे, बाळासाहेब खोमणे तसेच गणेश आगलावे, प्रशांत सातभाई, अनिल आगलावे, सतीश कदम, युवराज लांघी, मल्हार बारभाई आणि अन्य कार्यकर्त्यांचा समावेश होता.

चंपाषष्ठी निमित्त जेजुरी गडावर सजवण्यात आलेली आकर्षक रोषणाई, भक्तिभावाचा उत्साह आणि महाप्रसादाचा सोहळा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आणि उत्सवाला भव्यता प्राप्त झाली.

मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी, अर्थात चंपाषष्ठी, या दिवशी जेजुरी नगरीत पिवळ्या भंडाऱ्याचा आणि 'येळकोट येळकोट जय मल्हार'च्या जयघोषांनी अवघे वातावरण दणाणून गेले. भगवान खंडोबाच्या अवतारदिनाचे स्मरण करणाऱ्या या सोहळ्याला महाराष्ट्रभरातून भाविकांनी मोठी उपस्थिती लावली आहे.

या दिवसाचे धार्मिक आणि पुराणातील महत्त्व सांगणारी आख्यायिका भाविकांमध्ये आजही अतूट श्रद्धेने म्हटली जाते.

भाविकांच्या मते चंपाषष्ठीचा संदेश अत्यंत स्पष्ट आहे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे, दुर्बलांचे रक्षण करणे आणि धर्ममूल्यांची जपणूक करणे. भगवान खंडोबांच्या या अवतारदिनामुळेच चंपाषष्ठी हा महाराष्ट्राच्या संस्कृतीतील विश्वास, पराक्रम आणि भक्तीचा एक अनन्यसाधारण पर्व ठरतो.

### मणि-मल्लांचा वध आणि धर्मरक्षणाचा संकल्प

पुराणकथांनुसार मणि व मल्ल या दोन राक्षसांनी पृथ्वीवर प्रचंड अत्याचार सुरू केले होते. देव, ऋषी-मुनी त्रस्त होऊन भगवान शिवांच्या चरणी धावले. त्यावर भगवानांनी 'मल्लारी' हे रूप धारण करून मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीच्या दिवशी अवतार घेतला. भीषण युद्धात भगवानांनी प्रथम मल्लाचा व नंतर मण्याचा वध केला. पराभूत झालेल्या मण्याने क्षमा मागत भगवानांना विनंती केली, त्यावर शिवांनी त्याला आपल्या वाहनरूपात स्वीकारले. मण्याच्या कुबडीतून निर्माण झालेल्या हळदीच्या भंडाऱ्यामुळे आजही जेजुरीत पिवळ्या रंगाचा भंडारा उडतो, ही श्रद्धा आहे.

# समृद्ध पंचायतराज अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**भेंडी : (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत भेंडी ग्रामपंचायतीने आज (दि. 26 नोव्हेंबर 2025) गाव विकासाचा एकभव्य, प्रेरणादायी आणि आदर्श पायंडा पाडत सामुदायिक शक्तीचे दर्शन घडविले. गावातील तब्बल ३५० ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी होत स्वच्छता, रस्ते दुरुस्ती आणि सामुदायिक कामांच्या माध्यमातून आत्मनिर्भर ग्रामविकासाचे उत्तम उदाहरण घालून दिले.विद्यार्थ्यांचाही सक्रिय सहभाग किड्स लर्निंग स्कूल व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भेंडी येथील विद्यार्थी उपस्थित राहून स्वच्छता अभियानात



सहभागी झाले. "सरकारी योजनांवर अवलंबून न राहता गाव स्वतःच्या विकासाची जबाबदारी घेतो" हा संदेश विद्यार्थ्यांनी व ग्रामस्थांनी प्रत्यक्ष कृतीतून दिला. मूलभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणात श्रमदान अभियानांतर्गत चार जेसीबी व ट्रॅक्टरच्या मदतीने रस्त्यांची कामे २४ पांदन रस्त्यांची दुरुस्ती व सफाई खंडेराव महाराज व चिंतामणी महाराज स्मशानभूमी परिसरात स्वच्छता व सुधारणा एकलव्य नगर – भेंडी येथे श्रमदानातून रस्ते तयार या सर्व कामांची मोठ्या निष्ठेने अंमलबजावणी झाली. लोकसहभागातून दोन लाखांची आर्थिक मदत ग्रामपंचायतीस लोकसहभागातून तब्बल २ लाख रुपयांचा निधी देऊन ग्रामस्थांनी भेंडीच्या विकासाची भक्कम पायाभरणी केली. उपस्थित मान्यवर व ग्रामस्थअभियानावेळी सरपंच किशोर ठाकरे, उपसरपंच विजय रौंदळ, ग्रामपंचायत अधिकारी राजाराम खांडवी, माजी उपसरपंच योगेश रौंदळ, सदस्य शांताराम वाघ, गायत्री पवार, सिंधुबाई साळवे, माजी उपसरपंच व शेतकरी तालुका संघटना अध्यक्ष विलास रौंदळ हे मान्यवर उपस्थित होते.

# राधाबाई सलाम निवडणूक लढवणार

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया जवळ येत असताना इच्छुक उमेदवारांची लगबग सुरू झाली आहे. याच पार्श्वभूमीवर किनवट तालुक्यातील मांडवी जिल्हा परिषद गट अंतर्गत येणारा मांडवी पंचायत समिती गण सर्वसाधारण खुला आरक्षित झाला आहे. त्यामुळे या प्रवर्गातील आणि परिसरातील ओळखीच्या सामाजिक कार्यकर्त्या राधाबाई पुसाराम सलाम यांनी ही निवडणूक लढवावी, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

# लांडे स्थळ येथे खंडोबा मंदिरात चंपाषष्ठी उत्सव साजरा

- येळकोट येळकोट जय मल्हारचा जयघोष घुसला

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



नालेगाव वारुळाचा मारुती येथील खंडोबा मंदिरात चंपाषष्ठी निमित्त मोठा उत्सव साजरा करण्यात आला. मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. सकाळपासूनच भाविकांची मंदिरात गर्दी होती.

चंपाषष्ठी निमित्त श्री खंडेरायाला अभिषेक करण्यात आला.तसेच खंडोबा भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विजयकुमार बोरुडे व पद्माताई बोरुडे यांच्या हस्ते खंडोबाची महाआरती व जागरण गोंधळ करण्यात आले. यावेळी संदीप गिते,प्रभाकर गिते आदींसह नालेगाव पंचक्रोशीतील खंडोबा भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी भाविकांनी येळकोट येळकोट जय मल्हार चा जयघोष करत भंडारा उधळला. यावेळी सौ.पद्माताई बोरुडे म्हणाल्या,खंडोबा हे सर्वांचे कुलदैवत आहे. खंडोबा हा देव नवसाला पावत असल्याने चंपाषष्टी उत्सव सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. नालेगाव येथील खंडोबा मंदिर हे सर्व भाविकांचे श्रद्धास्थान आहे. येथे मनोभावे खंडोबारायाची भक्ती केली जाते.

# सौ. पुष्पाताई मच्छेवार यांच्या प्रचार कार्यालयाचे उत्साहात उद्घाटन



**किनवट : (समर्थ गांवकरी)**

महायुती तर्फे भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. पुष्पाताई आनंद मच्छेवार यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन बुधवारी संध्याकाळी बाबुलाल चौक येथे मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आले. उद्घाटन आ भिमराव केराम यांच्या हस्ते संपन्न झाले.

# दोन कोटीची खंडणी मागणाऱ्या आरोपीस ठोकल्या बेड्या

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

दि:- १५ नोव्हेंबर रोजी फिर्यादी मारुती मनोहर कदम वय-६१ वर्षे यांनी दाखल यांनी केलेल्या तक्रारीनुसार खामुंडी ता:-जुन्नर जि.पुणे येथील पती पत्नी १) विजय हरिदास फलके, वय ४० वर्षे २) पुनम विजय फलके, वय ३४ वर्षे व त्यांची अल्पवयीन मुलगी तसेच एक अनोळखी इसम यांनी फिर्यादीस पोस्को व बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देवून तब्बल दोन कोटी रूपये खंडणी मागीतल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. त्याबाबत ओतूर पोलीस स्टेशन ला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरच्या तक्रारीनुसार आरोपींनी अल्पवयीन मुलीचा गैरवापर करून खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली व फिर्यादी यांचेकडुन दिड



कोटी रूपयांचे प्रत्येकी पन्नास लाख रू.चे तीन चेक घेतले त्यानंतर राहीलेल्या पन्नास लाख रूपयांची फिर्यादी यांचेकडे वारंवार मागणी केली आहे.

सदरचा गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी पती पत्नी यांनी सत्र न्यायालय जुन्नर या ठिकाणी अटकपूर्व जामिन मिळवण्याचा प्रयत्न केला परंतू मा. कोटनि त्यांचा अटकपूर्व जामिन अर्ज फेटाळुन लावला. त्यानंतर पती पत्नीने अटकपूर्व जामिन मिळणेकामी मा. उच्च न्यायालय मुंबई या ठिकाणी अर्ज केला. मा. उच्च न्यायालय मुंबई या ठिकाणी सदरच्या अर्जावर २० वेळा सुनावणी झाली.तरी देखील सदर आरोपीचा अटक पूर्व जामिन मंजुर न झाल्याने सदर आरोपी याने दिनांक २४ नोव्हेंबर रोजी ओतूर पोलीस स्टेशन येथे आत्मसमर्पन केल्याने त्यास सदरच्या गुन्हयात अटक करण्यात आले आहे. सदरच्या आरोपीस अटक करून दिनांक २५ नोव्हेंबर रोजी रिमांडकामी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. जुन्नर या ठिकाणी हजर केले असता मा. न्यायालयाने विजय हरिदास फलके यास ७ दिवस पोलीस कस्टडी मंजुर केली आहे. आरोपी विजय हरिदास फलके याने अशाच प्रकारचे गुन्हे इतर ठिकाणी केले आहेत का? याबाबत व सदर गुन्हयाच्या अनुषंगाने सध्या त्याच्याकडे तपास चालु आहे. दाखल गुन्हयाचा तपास मा. संदिपसिंह गिल,पोलीसअधीक्षक सो.पुणे ग्रामीण, मा.रमेश चोपडे अप्पर पोलीस अधीक्षक सो.पुणे ग्रामीण,मा.धनंजय पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी सो.जुन्नर विभाग जुन्नर यांचे मार्गदर्शनाखाली ओतूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि लहु थाटे हे करत आहेत.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांना मताधिक्याने निवडून द्या - तटकरे

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

बिलोली - कुंडलवाडी नगरपरिषद निवडणुक प्रचारार्थ (दि. २६) रोजी शहरातील गांधी चौक येथे झालेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पार्टीच्या विराट जाहीर सभे दरम्यान शहराचा सर्वांगीण करायचं असेलतर हुकूमशाहीची सत्ता परिवर्तन करून राष्ट्रवादी कांग्रेस पक्षचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार इंद्रजित तुडमे तसेच २० नगरसेवक पदाच्या उमेदवारांना मताधिक्याने निडून द्या - प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची बिलोली शहर वासियांना "साद".यावेळी माजी मंत्री नवाब मलिक, राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर, माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थित होती. या जाहीर सभे दरम्यान अल्पसंख्यांक मंत्री नवाब मलीक , प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावर ,महिला प्रदेशाध्यक्षा ,रुपालीताई चाकणकर आदींनी आपले मनोगत व्यक्त केले प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ही सर्वधर्मसमभाव या तत्वानुसार चालणारी पार्टी आहे.बिलोली शहराच्या विकासासाठी राष्ट्रवादी पार्टी कटिबध्द असुन शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस च्या नगराध्यक्ष पदासह वीस नगरसेवकांना मताधिक्याने निवडुण आणा सत्तेवर अजित दादा पवार आहेत शहरासाठी म्हणेल तेवढा निधी देवुन आजपर्यत न झालेला विकास करुन शहराचा कायापालट करणार शहरातील जनतेने अजित दादा पवार यांच्यावर विश्वास ठेवुन राष्ट्रवादी पार्टी च्या सर्व उमेदवारांना मताधिक्याने निवडुण द्यावे असे आवाहान प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी केले राष्ट्रवादी च्या महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांनी महिलांचं सक्षमीकरण सबलीकरण हा राष्ट्रवादी कॉंग्रेसचा अजेंडा आहे व त्यासाठी अजीत दादा पवार यांनी लाडकी बहिण योजना आणली व सक्षमपणे राबवत आहेत.





अकोले : वसुंधरा अकॅडमी, अकोले येथे संविधान दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय संविधानाचे महत्त्व, त्यातील मूल्ये आणि विद्यार्थ्यांची जबाबदारी याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात अभिनव शिक्षण संस्थेच्या कोषाध्यक्ष तसेच प्राचार्या डॉ . जयश्री देशमुख व उपप्राचार्या राधिका नवले यांच्या हस्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

## थोडक्यात बातम्या...



### ब्राम्हणवाडा ग्रामपंचायतीत संविधान दिन उत्साहात साजरा!

ब्राम्हणवाडा (स. गांवकरी) : ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा येथे संविधान दिन मोठ्या उत्साहात, शिस्तबद्ध वातावरणात आणि देशभक्तीच्या भावनेने साजरा करण्यात आला. ग्रामपंचायतीत आयोजित केलेल्या या विशेष कार्यक्रमाला ग्रामस्थ तसेच पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास सरपंच संतोष भांगरे, उपसरपंच सुभाष गायकर, ग्रामपंचायत सदस्य रवींद्र हांडे, शिवाजी आरोटे, ग्रामविकास अधिकारी तसेच समाजसेवक गौतम शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपसरपंच सुभाष गायकर यांनी संविधानाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, “भारतीय संविधान हा केवळ एक ग्रंथ नसून आपल्या देशाची आत्मा आहे. समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांसारख्या मूल्यांना दिशा देणारे हे संविधान प्रत्येक नागरिकाला आपले हक्क आणि कर्तव्यांची जाणीव करून देते.” यानंतर ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांनी एकत्र येऊन संविधानाची प्रतिज्ञा घेतली. संविधानाचे महत्त्व, नागरिकांचे कर्तव्य, तसेच राष्ट्रनिर्मितीत युवकांची भूमिका याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये संविधानाबद्दलची जाण, आदर आणि बांधिलकी अधिक दृढ झाल्याचे उपस्थितांनी व्यक्त केले.




### सुरक्षिततेच्या दृष्टीने मटाने गावावर तिसऱ्या डोळ्याची नजर

देवळा (स. गांवकरी) : देवळा तालुक्यातील मटाने गावात नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून सात सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्यामुळे चोरी, अनुचित प्रकार तसेच हिंस्र प्राण्यांचा संभाव्य धोका यावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. सीसीटीव्ही विषयी माहिती देताना ग्रामविकास अधिकारी देविका ठाकरे यांनी सांगितले की, गावात प्रमुख वर्दळीच्या आणि संवेदनशील ठिकाणी कॅमेरे बसवण्यात आले आहेत. यामध्ये गावाचे मुख्य प्रवेशद्वार, मराठी शाळा, ग्रामपंचायत कार्यालय, श्री राम मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक तसेच प्रमुख लोकवस्ती परिसर यांचा समावेश आहे. ग्रामस्थांना सुरक्षित आणि भयमुक्त वातावरणात जीवन जगता यावे, यासाठी ग्रामपंचायतीने सीसीटीव्ही कार्यान्वित केला आहे. या प्रकल्पाचे नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर स्वागत करण्यात येत आहे. सीसीटीव्हीमुळे गुन्हेगारीवर आळा बसेल, तसेच आपत्कालीन प्रसंगी तत्काळ मदत मिळण्यासही हातभार लागणार आहे. ग्रामपंचायतीच्या या पुढाकाराची सर्व स्तरातून समाधानाची भावना व्यक्त होत असून, मटाने गाव सुरक्षिततेच्या बाबतीत नव्या युगात प्रवेश करत असल्याचे चित्र दिसत आहे.


**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष**

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.

दुरध्वनी : ०२०-२६१२५७७९ ईमेल: ddrpunegramingmail.com

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक. ५४/२०२५-२६

जा.क्र. ८००६ पुणे, दिनांकः २५/११/२०२५

सह्याद्री हाईटस सहकारी गृहरचना संस्था मर्यादित. स.नं.६४/१. चांडोली, ता. खेड, जि. पुणे. ४१०५०५ तर्फे श्रीमती वैशाली साहेबराव बोहाडे (सचिव), रा. सह्याद्री हाईटस सहकारी गृहरचना संस्था मर्यादित...... **अर्जदार**

**विरुद्ध**.........मे. सर्वज्ञ एन्टरप्राईजेस तर्फे १) श्री. संग्राम सुर्यकांत सातकर (विकासक/जागा मालक) २) श्री. सुदैव नंदु काळे (विकासक), ३) श्रीमती. सुरेखा सुर्यकांत सातकर (जागा मालक) ४) श्री. जिवन सुर्यकांत सातकर (जागा मालक), ५) श्रीमती सिमा दिपक काळभोर (जागा मालक)

वरील क्र. ०१ ते ०५ सर्व रा. चांडोली, ता. खेड, जि. पुणे. ४१०५०५, ......**जाबदेणार**

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप अॅक्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार क्रमांक ०१ ते ०५ यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक १५/१२/२०२५ रोजी दुपारी ४.०० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५. बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक २५/११/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

(प्रकाश ल. जगताप)
सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे, (ग्रामीण)


# पोदार प्रेप संगमनेरच्या वार्षिक संगीत महोत्सवात कलेचा अविष्कार

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

पोदार प्रेप संगमनेर चा बहुप्रतीक्षित वार्षिक संगीत महोत्सव (Annual Concert) 'जंबो के संग, सुर और साज का संगम' नुकताच मोठ्या उत्साहात आणि दिमाखात मालपाणी लॉन्स येथे संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी श्री. अरूणजी उंडे यांनी आपली उपस्थिती दर्शविली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने झाली. पोदार प्रेपच्या C.A.O. फाउंडर - डायरेक्टर डॉ. स्वाती वत्स यांनी व्हिडिओच्या माध्यमातून उपस्थित पालकांशी संवाद साधत आयोजित कार्यक्रमाचे प्रयोजन सांगताना संगीत आणि संगीत वाद्य यांच्या माध्यमातून शैक्षणिक व मानसिक विकास कसा होतो व विद्यार्थी देशाचे सुजाण नागरिक म्हणून कसे तयार होतील हे समजावून सांगितले.

त्यानंतर प्रमुख पाहुणे श्री. उंडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व स्पष्ट केले. सद्यस्थितीत पालकांच्या अति मोबाईल वापरामुळे व विद्यार्थ्यांवर मोबाईल सारख्या उपकरणांचा पगडा असल्याने होणाऱ्या परिणामांविषयी चिंता व्यक्त करत, मुलांमध्ये योग्य मूल्यसंस्कार रुजविण्याची जबाबदारी पालकांनी जाणून घ्यावी असे आवाहन केले. त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले आणि अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.पोदार प्रेपच्या मुख्याध्यापिका सौ. सोनल शुक्ला यांनी सर्व पालकवर्गाचे शब्दसुमनांनी स्वागत केले व कार्यक्रमाच्या आयोजनाचे महत्व व त्याची पार्श्वभूमी समजावून सांगितली.

तसेच विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी कार्यक्रमापूर्वी केलेल्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या सौ. मिनाक्षी मिश्रा यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शाळेच्या शैक्षणिक तसेच सह-अभ्यासक्रमातील यशावर प्रकाश टाकला. त्यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक, पालक, उपस्थित श्रोत्यांचे आणि विद्यार्थ्यांचे भरभरुन कौतुक केले. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी शास्त्रीय संगीत, लोकनृत्य, वाद्यवृंद आणि अप्रतिम नृत्याविष्कारासह विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या उत्कृष्ट सांगीतिक आणि कलात्मक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

प्रत्येक सादरीकरण विद्यार्थ्यांची व शिक्षकांची वर्षभराची मेहनत आणि सर्जनशीलता दर्शवत होते. पालकांनी आणि उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला भरभरून दाद दिली. हा वार्षिक संगीत महोत्सव केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम नव्हता, तर तो विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास, सांघिक कार्य (teamwork) आणि कलात्मक अभिव्यक्तीला प्रोत्साहन देणारा एक महत्त्वाचा टप्पा होता.




## ग्लोबल इंग्लिश शाळेत मोबाईल प्लेनेस्टेरीयमचे आयोजन

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दिव्यात ग्लोबल इंग्लिश शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी मोबाईल प्लॅनेस्टेरियम या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या ग्रहांचे, यानांचे तसेच तारामंडल यांचे तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तारामंडल भ्रमण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी तारामंडल भ्रमणाचा अलौकिक आनंद घेऊन आपल्या विविध प्रकारच्या शंकांचे निरासन केले. तसेच शिक्षकांनी देखील तारामंडल भ्रमणाचा आनंद घेतला. यातून विज्ञान युगाचा बोध विद्यार्थ्यांना आला. कार्यक्रमाप्रसंगी संस्थेची संचालक महेंद्र दळवी यांच्या सह प्राचार्य, मुख्यध्यपक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी ते साठी सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद यांनी अथक परिश्रम घेतले.




## प्रदूषणाचा गर्भवती महिलांवर, मुलांवर होतोय गंभीर परिणाम

- डॉक्टरांचा इशारा; पुण्यातील प्रदूषणातील वाढ हानीकारक

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

बहुतांश लोकांना वाटते की प्रदूषण ही केवळ उत्तर भारतातील समस्या आहे. मात्र, वास्तव यापेक्षा कठोर आहे. अनियंत्रित शहरीकरण आणि वाहनांच्या वाढत्या धुरामुळे प्रदूषण आज संपूर्ण भारतासाठी गंभीर आरोग्यसंकट बनले आहे. राष्ट्रीय राजधानी दिल्लीमध्ये काही आठवड्यांपासून 'एअर क्वालिटी इंडेक्स' अर्थात 'एक्यूआय' ४००हून अधिक नोंदविण्यात आला असून, तो 'गंभीर' श्रेणीत मोडतो. दिल्लीपेक्षा काही वेगळी परिस्थिती पुण्यात नाही. गेल्या काही दिवसांत पुण्यातील 'एक्यूआय' सातत्याने २००च्या वर गेला असून, तो 'खराब' श्रेणीमध्ये मोडतो. असे दीर्घकालीन प्रदूषण गर्भवती महिला, मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी अत्यंत धोकादायक ठरू शकते. या संदर्भात सूर्या मदर अँड चाइल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पुणे येथील पेडियाट्रिक्स आणि निओनेटलॉजी सल्लागार डॉ. जयंत खंदारे म्हणाले, की महानगरांमध्ये, त्यातही पुण्यातील वाढत्या प्रदूषणाचा गर्भवती महिलांवर आणि मुलांवर अतिशय घातक परिणाम होत आहे. मुले दूषित हवेला सामोरे गेल्यास त्यांना घरघर, श्वास घेण्यास त्रास आणि दमा होण्याचा धोका वाढतो. याशिवाय पुण्यातील विषारी हवा गर्भवती महिलांसाठीही गंभीर श्वसनासंबंधी अडचणी निर्माण करू शकते.

### गर्भवती महिलांवरील प्रदूषणाचे दुष्परिणाम

- गर्भपात, मृतजन्म आणि अकाली प्रसूतीचा वाढलेला धोका
- बाळाचे कमी वजन आणि गर्भाच्या वाढीमध्ये मर्यादा
- उच्च रक्तदाब, गर्भावस्थेतील मधुमेह आणि हृदयविकाराचा धोका
- प्लेसेंटाचे नुकसान आणि बाळाकडे जाणाऱ्या ऑक्सिजन पुरवठ्यात घट

### प्रदूषणाचे मुलांवरील दुष्परिणाम

- दमा, न्युमोनिया यांसारखे श्वसनाचे गंभीर त्रास.
- अॅलर्जी आणि शिकण्यात अडचणी येण्याचा धोका.
- फुफ्फुसांची वाढ खुंटणे आणि क्षमता कमी होणे.
- संसर्ग आणि आजारांची लागण होण्याची शक्यता.

# आदर्श इंग्लिश हायस्कूलच्या क्रीडा महोत्सवाचे नानजीभाई ठक्कर यांच्या हस्ते भव्य उद्घाटन!

**ठाणे: (समर्थ गांवकरी)**

आदर्श इंग्लिश हायस्कूलतर्फे आयोजित क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ आज (२७ नोव्हेंबर २०२५) शिक्षण महर्षी श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला आणि श्री जीज्ञेशभाई जोशी महाराज यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. प्राचार्या सौ. मीना जाधव, शिक्षकवर्ग तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना नानजीभाई ठक्कर म्हणाले, “खेळ म्हणजे केवळ जिंकणे-हरणे नव्हे; खेळ म्हणजे शिस्त, मेहनत, टीमवर्क आणि व्यक्तिमत्त्व घडवणे. अभ्यासाइतकेच खेळही दैनंदिन जीवनात महत्त्वाचे आहेत.”

शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक प्रसन्नता आणि जिंकण्याची जिद्द खेळामुळे वाढते यावर त्यांनी भर दिला. “यश ही शेवटची पायरी असते, पण प्रयत्न हा पहिला टप्पा असतो,” असे सांगत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला. खेळात कधी जिंकावे लागते, कधी पराभव स्वीकारावा लागतो; पण तो पराभव हा पुढील विजयाची तयारी असतो, असेही त्यांनी नमूद केले.

यानंतर श्री जीज्ञेशभाई जोशी महाराज यांनी उपस्थितांना संबोधित करताना सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. “जिंकण्यापेक्षा खेळण्याचा आनंद आणि प्रामाणिक प्रयत्न अधिक मौल्यवान आहेत.

नियमांचे पालन करा, प्रतिस्पर्ध्याचा आदर ठेवा आणि आपले सर्वोत्तम द्या,” असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

तसेच त्यांनी “खेळ हा जीवनाचा आत्मा आहे; आणि खेळाडू म्हणजे प्रेरणा,” असे सांगत उत्साहपूर्ण वातावरणात विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले.

कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन प्राचार्या मीना जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.

क्रीडा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना मिळून आरोग्य, शिस्त आणि आत्मविश्वासाचा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचला.



# जुन्नर तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील आदिवासी मुलांना स्लीपिंग किटचे वाटप

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

रोटरी क्लब पुणे कॅन्टोन्मेंट रोटरी क्लब निगडी पुणे रोटरी क्लब नारायणगाव हायवे आणि स्कॉ-कॅनडा तसेच चाइल्ड फंड इंडिया शाखा मढ यांच्या संयुक्त माध्यमातून जुन्नर तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील आदिवासी शालेय गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना सातशे स्लीपिंग किटचे वाटप करण्यात आले अशी माहिती रोटरी क्लब नारायणगाव हायवेचे अध्यक्ष रो.डॉ.उत्तम घोरपडे यांनी दिली. सदर विविध उपयोगी वस्तूंचे वाटप जुन्नर तालुक्यातील मढ येथे नुकतेच करण्यात आले. विद्यार्थ्यांना विविध उपयोगी एकोणचाळीस वस्तूंचा समावेश असलेले संपूर्ण किट कॅनडा या देशातून आलेल्या हेलन स्कुट, जूली गिबसन यांच्या हस्ते स्लीपिंग क्लिप साहित्याचे वितरण करण्यात आले. पुणे जिल्ह्यामध्ये सामाजिक काम करणाऱ्या रोटरी संस्थेच्या अंतर्गत रोटरी क्लब पुणे, कॅन्टोन्मेंट रोटरी क्लब निगडी आणि रोटरी क्लब नारायणगाव हायवे या तीन रोटरी क्लबचा संयुक्त उपक्रम मढ (जुन्नर) ग्रामीण व ट्रायबल परिसरातील ७०० आदिवासी व गरीब विद्यार्थ्यांना स्लीपिंग किटचे वाटप करून थंडीपासून संरक्षण व शिक्षणासाठी प्रोत्साहन देणारा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.असे मत रोटरी क्लब नारायणगाव हायवेचे अध्यक्ष डॉ. उत्तम घोरपडे यांनी व्यक्त केले कार्यक्रमासाठी कॅनाडा येथून विशेष उपस्थिती म्हणून हेलन स्कुट,जूली गिबसन हेलन स्कुट सहभागी झाल्या. त्या म्हणाल्या, “गरीब आणि आदिवासी विद्यार्थ्यांसाठी रोटरीचा सहभाग अतिशय उपयुक्त आहे. या किटमुळे त्यांची शैक्षणिक क्वालिटी नक्कीच सुधारेल. रोटरी क्लब पुणे कॅन्टोन्मेंट च्या अध्यक्षा डॉ. हेमा पांडे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी रोटरी क्लब ऑफ निगडी चे अध्यक्ष केशव मांगे म्हणाले, की “हा प्रकल्प विद्यार्थ्यांना मोठा आधार देणारा आणि त्यांच्या भविष्यासाठी उपयुक्त ठरणारा आहे.” अशा उपक्रमामुळे भारतातील भावी नागरिक घडवण्यासाठी रोटरीच्या माध्यमातून काही अंशी मदत होत असते तसेच रोटरीच्या या सामंजस्यामुळे सामाजिक उपयोगी कारणे करण्यासाठी प्रेरणा देखील मिळत असते. या उपक्रमासाठी पुण्यातून रो. वैभव पोरे, रो. पंकज आपटे, रोहित कॉन्ट्रॅक्टर, रो. समीर रूपाणी, तसेच निगडी व नारायणगाव हायवे क्लबचे अनेक सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रोजेक्ट इन्चार्ज रो.रवींद्र वाजगे, मंदाकिनी दांगट,डॉ. हेमलता गुळवे, डॉ. नंदिनी घाडगे, बाळासाहेब ढमाले, अंबादास वामन , API सुकाजी मुळे, सुनील परदेशी,नितीन भुजबळ, सौ. अपेक्षा शिंदे,जगदीश हांडे यांनी मोठा सहभाग दिला.

या कार्यक्रमाच्या आयोजनात चाइल्ड फंड इंडिया मढ येथील मुख्य अधिकारी अभिजित मदने व त्यांच्या टीमने महत्वाची भूमिका बजावली.कार्यक्रमाला मढ ग्रामपंचायतीच्या सरपंच अरुणा मस्करे, माजी जिल्हा परिषद सदस्य पंडित मेमाणे, माजी सरपंच महेंद्र सदाकाळ व माजी आमदार बाळासाहेब दांगट यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रीकांत फुलसुंदर यांनी केले तर सेक्रेटरी हनुमान भंडारे यांनी आभार मानले.



# बंधुतेची आराधना करणारे भारतीय संविधान सर्वश्रेष्ठ

■ शिक्षण सहसंचालक डॉ. बाबासाहेब भोसले यांचे प्रतिपादन



**नवीन नांदेड (समर्थ गांवकरी)**

समता, स्वातंत्र्य, न्याय बंधुता या तत्त्वांची आराधना करणारे भारतीय संविधान जागतिक स्तरावर सर्वश्रेष्ठ गणले गेले आहे.

अशा भारतीय संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार आणि कर्तव्य प्रत्येक भारतीयाने जाणून घेऊन तसे अवलोकन केले पाहिजे, असे प्रतिपादन नांदेड येथील विभागीय शिक्षण सहसंचालक डॉ. बाबासाहेब भोसले यांनी केले.

श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी नांदेड येथे भारतीय संविधान दिन उत्साह साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब भोसले बोलत होते. वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.शेटे एस.व्ही.,

उपप्राचार्य डॉ. व्ही आर. राठोड यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

डॉ.व्ही.एम देशमुख यांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले. नांदेड विभागीय शिक्षण सहसंचालक डॉ. बाबासाहेब भोसले यावेळी बोलताना पुढे म्हणाले, भारत देश हा विविध प्रांत,भाषा आणि विविधतेने नटलेला आहे. असा संपूर्ण देश एका संविधानाच्या परिपूर्णतेमुळे आज एकसंघ झालेला पाहायला मिळतो. प्रत्येक भारतीयाला आज भारतीय संविधान सुरक्षिततेची भावना- हमी देतो; हे या संविधानाचे मोठे वैशिष्ट्य आहे,असेही ते यावेळी म्हणाले.

प्रशासन, न्यायपालिका आणि शासन हे भारतीय संविधानाचे प्रमुख घटक असून जगामध्ये सर्वोत्तम लोकशाहीचा दस्तावेज म्हणून भारतीय संविधान सर्वश्रेष्ठ ठरले आहे, असे मत यावेळी अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना डॉ. शेटे एस. व्ही.यांनी भारतीय संविधानावर विस्तृतपणे अभ्यासपूर्ण असे मार्गदर्शन केले.



ठाणे, दिवा : टोरेंट पॉवर आणि महावितरणने २५ नोव्हेंबर रोजी शिळ येथील अरिहंत कार्यालयात आणि २६ नोव्हेंबर रोजी भिवंडीतील चविंद्र येथील अर्श कार्यालयात विशेष ग्राहक सेवा शिबिराचे आयोजन केले होते. या ग्राहक सेवा शिबिराला ग्राहकांकडून खूप सकारात्मक प्रतिसाद मिळाला, दोन्ही ठिकाणी एकत्रितपणे ७०० हून अधिक ग्राहकांनी उपस्थिती नोंदविली.

## थोडक्यात बातम्या...



### उमेदवार सौ. सुजाता येंड्रलवार यांच्या प्रचार कार्यालयाचे भव्य उद्घाटन

किनवट (स. गांवकरी) : नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. सुजाता विनोद येंड्रलवार यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन बुधवारी दि२७ नोव्हेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे, राष्ट्रवादी काँग्रेस नेत्या श्रीमती बेबीताई नाईक, युवानेते कपिल नाईक, ,माजी नगराध्यक्ष के. मुर्ती, माजी जिल्हा परिषद सदस्य बंडु नाईक करण येंड्रलवार, तालुका प्रमुख मारोती दिवसे पाटील, ॲड. राहुल धनलाल नाईक, प्रकाश गब्बा राठोड, उपसभापती राहुल नाईक, संचालक अनिल पाटील क-हाळे, युवा नेते यश खराटे, प्रशांत कोरडे, अतुल दर्शनवाड, सौ. ललिता मुनेश्वर, मारोती मुनेश्वर, दैवशाला भालेराव यांच्यासह आघाडीतील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनानंतर खासदार आष्टीकर यांनी शहरातील विविध प्रभागामध्ये व्यक्तिशः भेट देत लोकांशी संवाद साधला. नागरिकांना सौ. सुजाता येंड्रलवार यांच्याबाबत विश्वास व्यक्त करत विकासाच्या अपेक्षा मांडल्या. सौ. सुजाता येंड्रलवार यांनी किनवट शहराला लोकाभिमुख नेतृत्व देऊन पारदर्शक व विकासाभिमुख प्रशासनाचे लक्ष्य जाहीर केले. महाविकास आघाडीच्या प्रचारामध्ये महिलांचा व युवकांचा वाढता सहभाग हा या निवडणुकीतील महत्त्वाचा घटक ठरणार आहे.

### स्वारातीम विद्यापीठाच्या १ व २ डिसेंबरच्या परीक्षा रद्द




नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या हिवाळी-२०२५ परीक्षांना ११ नोव्हेंबरपासून सुरुवात झाली आहे. दरम्यान, दि. २ डिसेंबर रोजी नगरपरिषद व नगरपंचायत सार्वजनिक निवडणुकीसाठी मतदान होत असल्याने आणि विद्यापीठाशी संलग्न असलेल्या काही महाविद्यालयांचा मतदान केंद्रम्हणून वापर होत असल्यामुळे दि. १ डिसेंबर व २ डिसेंबर २०२५ रोजी नियोजित परीक्षा रद्द करण्यात आल्याची माहिती परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हुशारसिंग साबळे यांनी दिली. रद्द झालेल्या परीक्षा संबंधित अभ्यासक्रमाच्या शेवटच्या दिवशी आयोजित करण्यात येणार असून याबाबत सर्व विद्यार्थ्यांनी अद्ययावत वेळापत्रकाची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, तसेच ही सूचना सर्व संबंधित विद्यार्थी, प्राध्यापक आणि महाविद्यालयांपर्यंत पोहोचवावी, असेही पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### स्वारातीम विद्यापीठात 'अन्वेषण २०२५-२६' संशोधन स्पर्धेचे भव्य आयोजन

■ १३० विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रकल्पांचे दमदार सादरीकरण

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे आयोजित विद्यापीठस्तरीय विद्यार्थी संशोधन अधिवेशन 'अन्वेषण २०२५-२६' चे मंगळवारी (२६ नोव्हेंबर) विद्यापीठ परिसरातील औषधनिर्माणशास्त्र संकुलात दिमाखात उद्घाटन करण्यात आले. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन संपन्न झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, औषधनिर्माणशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. एस. एस. पेकमवार, तसेच डॉ. एच. एस. फडेवार, डॉ. वसंत वाघ, डॉ. बाबुराव जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. भारतीय विद्यापीठ संघाद्वारे देशभर राबविण्यात येणारा 'अन्वेषण' हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये संशोधन संस्कृती जोपासण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत असल्याचे मत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर व्यक्त केले. विद्यार्थ्यांची संशोधनवृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नवकल्पनाशक्ती बळकट करण्यासाठी हे व्यासपीठ महत्त्वपूर्ण असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. या अधिवेशनात कृषी, मूलभूत विज्ञान, अभियांत्रिकी-तंत्रज्ञान, आरोग्य व समृद्धी विज्ञान, फार्मसी, समाजशास्त्र, वाणिज्य-कायदा आणि आंतरशाखीय संशोधन अशा सहा प्रमुख विभागांतर्गत ७४ संशोधन प्रकल्पांचे प्रभावी सादरीकरण झाले. विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालये व संकुलांतील एकूण १३० विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. स्पर्धेत सोफिया पठाण, अस्मिता इंगळे, स्वप्निल कांबळे, वैष्णवी हेसे, वैष्णवी मलेवाड, गौतम दूरगम, आदित्य मोदिराज, यश जाभुरकर, विशाल वाडेकर, दिगंबर आजल आणि गीतांजली आबादे यांनी सादर केलेल्या प्रकल्पांना प्रथम क्रमांकाचे मानांकन मिळाले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आगामी वेस्ट झोन 'अन्वेषण' स्पर्धेत, सरदार वल्लभभाई पटेल विद्यापीठ, आनंद (गुजरात) येथे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.

# पोषण आहार चालविणाऱ्या स्वयंपाकी मदतनीस कर्मचाऱ्यांचे मानधन तात्काळ द्या

■ पोषण आहार कर्मचाऱ्यांचे जि प मुख्य कार्यकारी अधिकारी ओकांर पवार यांना निवेदन




**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**

इगतपुरी तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज टाकेद येथील शालेय पोषण आहार चालविणाऱ्या ओम साई स्वयंसहाय्यता आदिवासी महिला समूहाच्या कर्मचारी महिलांचे गेल्या तीन महिन्यांचे मानधन संबंधित शिक्षण विभाग प्रशासनाने विनाकारण रखडवले असून रखडलेले मानधन तात्काळ देण्यात यावे या मागणीचे निवेदन शालेय पोषण आहार स्वयंपाकी,मदतनीस कर्मचारी यांनी नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी ओकांर पवार यांना दिले आहे.दरम्यान न्यू इंग्लिश स्कूल टाकेद येथील सन : २०२५-२६ या वर्षीचा शालेय पोषण आहार शिजविण्यासाठी शाळेकडून शालेय शिक्षण व व्यवस्थापन समितीच्या निवडीने आम्ही स्वयंपाकी म्हणून रीतसर अर्ज देऊन १० महिन्यांसाठी आम्ही चालविण्यास घेतला आहे.दि०१/०९/२०२५ रोजी पासून ते आजपर्यंत आम्ही आमच्या स्वखर्चाने पोषण आहार चालविला आहे.आजपर्यंत आम्हाला स्वयंपाकी मदतनीस कर्मचारी म्हणून आमच्या श्रमाचे एक रुपयाही मानधन मिळालेले नाही.तरी देखील आम्ही चांगल्या प्रतीचा पोषण आहार शिजवून शासनाचे नियम अटी शर्तीला अधिन राहून विद्यार्थ्यांना शाळेच्या राखून दिलेल्या वेळेत रोज सातत्याने वाटप करत आहोत. आजपर्यंत आमच्या पोषण आहार शिजविण्यासंदर्भात कोणत्याही विद्यार्थी अथवा पालकांची कुठलीही तक्रार नाही.याउलट याअगोदर चांगल्या दर्जाचा पोषण आहार विद्यार्थ्यांना उपलब्ध होत नव्हता तो आज आम्ही विद्यार्थ्यांना पोषक व पूरक आहार विद्यार्थ्यांना योग्य रित्या देत आहे. विद्यार्थी देखील पोषण आहार चांगला आहे अशी प्रतिक्रिया देत आहे.दैनदिन वेळापत्रकानुसार रोजच्या मेनू नुसार चांगला दर्जाचा चवदार पोषण आहार दिल्यामुळे आज पोषण आहार खाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या देखील वाढली आहे.परंतु आजपर्यंत आम्ही आमच्या कष्टाचे श्रमाचे मानधन अनेकदा मुख्याध्यापक श्री संजय हिलाल पाटील यांच्याकडे मागितले परंतु आजपर्यंत त्यांनी आमच्या या प्रश्नांची गांभीर्याने कोणतीही दखल घेतलेली नाही.

आमच्या प्रश्नाकडे आजपर्यंत कानाडोळा केला असून,कायम मुख्याध्यापक हे सर्रासपणे रजेवर जात असतात

## अहमदनगर जिल्हा बँक सोनेतारण व्यवसाय वाढवणार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सोनेतारण व्यवसायात वाढ करणार असून त्या दृष्टीने बँकेचा सेवक हा प्रशिक्षित होणे गरजेचे असल्याने जिल्हा बँकेने सेवकांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे. बँकेचे सोने तारण कर्जावरील व्याजदर इतर बॅकांच्या तुलनेत कमी असून आता सेवकांनी टार्गेट ओरिएंट काम करण्याच्या दृष्टीने कामकाज करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत चेअरमन माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांनी केले. जिल्हा बँकेला मोठा इतिहास असून बँकेची परंपरा अतिशय उज्वल आहे. बँकेने नेहमीच शेतकरी, ग्राहकांच्या आणि सभासदांच्या हिताचे दृष्टीने कामकाज केले आहे असेही घुले पाटील या प्रसंगी म्हाणाले. बँकेच्या पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील सभागृहामध्ये बँकेचे जिल्ह्यातील शाखांतील सेवकांकरता सोने तपासणी व त्या संदर्भात आणि अडचणी संदर्भातील प्रशिक्षण वर्गप्रसंगी चेअरमन चंद्रशेखर घुले पाटील बोलत होते. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे यांनी या प्रशिक्षण वर्गाचे महत्त्व विशद करून बँकेचे सेवक निश्चित प्रमाणे सोने तारण व्यवसाय वाढवतील अशी ग्वाही वर्पे यांनी दिली.

## जुन्नर तालुका अध्यक्ष उत्तम वायदंडे यांच्याकडून संविधान प्रत भेट

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करून संविधान दिनाचे औचित्य साधून उपविभागीय अधिकारी धनंजय पाटील यांना संविधान प्रत सत्यशोधक बहुजन आघाडी जुन्नर तालुका अध्यक्ष उत्तम वायदंडे यांनी दिली. यावेळी उपविभागीय अधिकारी धनंजय पाटील यांनी सांगितले की , संविधानाप्रमाणे जबाबदारी प्रमाणिकपणे पार पाडत आहे. आजही संविधान पूर्ण पाठ आहे असे गौरव उद्गार यावेळी काढले .

भारतीय संविधानातील मूल्ये आणि लोकशाहीच्या बळकटीसाठी सर्वांना सजग रहा यासाठी संविधान प्रत देण्यात येत आहे असे तालुका अध्यक्ष उत्तम वायदंडे यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी मनेश आल्हाट , कैलास बोमाटे, रामभाऊ खंडागळे ,राहुल गायकवाड , रवी साळवे व इतर संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते .

यानंतर तहसीलदार डॉ. सुनील शेळके , गटविकास अधिकारी प्रतीक चन्नावार , आळेफाटा पोलीस निरीक्षक विश्वास जाधव , गोपनीय अधिकारी विनोद गायकवाड , महसूल पुरवठा अधिकारी ज्ञानेश कुलकर्णी , समाज कल्याण अधिकारी शंकर भालेराव , तलाठी शामराव सलामी , तलाठी हेमंत भागवत, ग्रामसेवक सचिन शिंदे , माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहल शेळके , सरपंच जयश्री गाडेकर, बेल्हा बीट पोलीस अधिकारी विकास गोसावी , तालुक्यातील सर्व शासकीय अधिकारी यांना संविधान प्रत भेट देण्यात आली .

## भव्य संविधान सन्मान रॅलीने तामसेकरांचे लक्ष वेधले

**तामसा : (समर्थ गांवकरी)**




संविधान दिनाच्या औचित्य साधून तामसा येथे भव्यदिव्य संविधान सन्मान रॅली न तामसेकऱ्यांचे लक्षवेधले.तामसा येथे संविधान दिनानिमित्त विविध ठिकाणी संविधान सन्मान रॅली काढण्यात आली विद्यासागर मुलीचे हायस्कूल, पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेतमजूरवाडी या शाळेच्या विध्यार्थीयांनी शहरात प्रभात रॅली काढून डॉ बाबासाहेब आंबेडकर च्या जयघोष देत हातात संविधानाचे पुस्तक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर च्या प्रतिमा चे, डॉ बाबासाहेब प्रतिकृती वेशभूषा धारणकरून भव्यदिव्य सन्मान रॅली काढण्यात आली.

आंबेडकर नगर पासून शहरात मुख्यमार्गाने रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे बुद्ध विहार येथे संविधान सन्मान रॅली चा समारोप करण्यात आलं या रॅलीत भीम टायगर सेना संस्थापक दादासाहेब शेळके, वंचित बहुजन आघाडी चे युवा तालुका अध्यक्ष जयकीन रावळे, प्रतिष्ठित व्यापारी उद्योजक सचिन औटे,विध्यार्थी आघाडी चे विशाल भालेराव, रत्नाकर जाधव, मुन्ना जाधव, अंकुश जाधव,रवी वाघमारे, विठ्ठल हनवते, यशवंत वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य आकाश जाधव,राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी तालुका अध्यक्ष मनीषा जाधव, भीमराव कांबळे, मुकिंद रावळे, अरविंद रावळे, आकाश जाधव सह आंबेडकर प्रेमी महिला पुरुष संविधान सन्मान रॅलीत सहभागी झाले.

## आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तीन समाजकंटक हद्दपार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर शहरातील आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी कोतवाली पोलीस स्टेशनचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी सूत्रे हाती घेताच मोठी कारवाकाका ऊर्फ अब्दुलहक फकीर मोहंमद कुरेशी, रा. झेंडीगेट, अहिल्यानगर फैजान इद्रिस कुरेशी, ( रा. झेंडीगेट, जि. ता. अहिल्यानगर), म्हम्या ऊर्फ संदिप शरद शिंदे, ( रा. तय्यब मशीद मागे, जि. ता. अहिल्यानगर ) भगवान चाळ ( रा. भोसले आखाडा, जि. ता. अहिल्यानगर ) यांच्याविरोधात कारवाईचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यामार्फत प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयात सादर करण्यात आला. त्यावर सुनावणी होऊन मा. उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर यांनी वरील तिन्ही व्यक्तींना सहा महिन्यांकरिता जिल्हयातून हद्दपार करण्याचे आदेश दिले.

# अकोले शहरात दिवसाढवळ्या चार बिबट्यांचे दर्शन

## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

शहरात गेल्या दोन दिवसांपासून बिबट्यांच्या वावराने नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. गुरुवारी दुपारी वृंदावन कॉलनी परिसरात एकाचवेळी चार बिबट्यांचे दर्शन झाल्याने परिसरात खळबळ उडाली. विशेष म्हणजे, हे ठिकाण वनविभागाच्या कार्यालयाजवळच असल्याने आता बिबटे थेट शहरात वावर करण्यास सुरुवात केल्याचा सूर नागरिकांमध्ये ऐकू येत आहे.

वृंदावन कॉलनी परिसरात बिबट्यांचा मुक्त संचार : गुरुवारी दुपारी गणराज दुकानांसमोर आणि वृंदावन कॉलनी भागात चार बिबटे दिसल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. परिसरात मोकाट कुत्र्यांचा मोठा वावर असल्याने बिबट्यांना सहज खाद्य उपलब्ध होते. त्यातच परिसरात उसाचे दाट जंगली स्वरूपात साम्राज्य असल्याने त्यांना लपण्यासाठी मोठे आश्रयस्थान तयार झाले आहे.

अभिष्टचिंतन सोहळ्यादरम्यान गोंधळ : बुधवारी रात्री सुमारे 8.45 वाजता अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इंजि. सुनील दातीर यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त गणराज समूहाजवळ मोठी गर्दी जमली होती. त्याच दरम्यान एका बिबट्याने रस्त्यावर झेप घेत दर्शन दिले. अचानक झालेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली आणि अनेक जण धावाधाव करू लागले.



**लेखन : सोनेरी आरोटे, राजा हरिश्चंद्र गडावरून**

## वनविभागही चिंतेत

वनविभागाचे कार्यालय जवळ असतानाही बिबट्यांचे मुक्त संचार सुरूच असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. "आमच्या कार्यालयासमोरच बिबटे थाटून बसलेत, आता तेच शहरात हजेरी लावणार का?" असा प्रश्नही नागरिक विचारत आहेत.

या मार्गावर आयटीआय कॉलेज तसेच मोठ्या प्रमाणावर नागरिक, लहान मुले व ज्येष्ठ नागरिक पायी फिरतात. त्यामुळे या घटनेने भीती अधिकच वाढली आहे.

दिवसाढवळ्या दर्शनामुळे नागरिक हैराण; बाजारपेठही ओस: गुरुवारी पुन्हा त्याच परिसरात चार बिबट्यांनी दर्शन दिले. दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे आठवडे बाजार असलेला दिवस असतानाही बाजारपेठ ओस पडू लागली. अनेक नागरिक रिक्षा अथवा अन्य साधनांनी घरी निघून गेले. शाळांनी देखील दुपारी चार वाजताच विद्यार्थ्यांना सुट्टी दिली.

अकोले शहरातील वाढता बिबट्यांचा वावर पाहता नागरिक सतर्क आहेत. वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सर्व स्तरांतून होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# सहकारमहर्षी किसनराव वराळ पाटील यांचे योगदान मोठे



पारनेरः (समर्थ गांवकरी)

सहकारमहर्षी किसनराव वराळ पाटील यांनी गावचा कारभार पन्नास वर्षापेक्षा जास्त करीत बिनविरोध निवडणूक करीत ग्रामपंचायत व सेवा सोसायटी माध्यमातून सर्वसामान्य जनतेचा विकास करण्यासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले असल्याचे प्रतिपादन निघोज सोसायटीचे सचिव रामदास भोसले यांनी व्यक्त केले आहे. निघोज सोसायटी सभागृहात सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष सहकारमहर्षी किसनराव वराळ पाटील यांची ३१ वे पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांना सोसायटी पदाधिकारी व सभासद तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करीत आदरांजली अर्पण करण्यात आली यावेळी भोसले बोलत होते. सोसायटीचे माजी उपाध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे कॉंग्रेसचे तालुका उपाध्यक्ष वसंतराव ढवण या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी डिजिटल चावडी या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष मंगेश वराळ पाटील, कुकडीचे सेवानिवृत्त अधिकारी बाळासाहेब वराळ, शिक्षक किसनराव वरखडे, ज्ञानदेव ढवण, ग्रामपंचायत माजी सदस्य दगडू ढवण तसेच सभासद उपस्थित होते. भोसले यावेळी म्हणाले गेली ३१ वर्षांपासून कै. किसनराव वराळ पाटील यांनी केलेल्या विकासाभिमुख कामांची आठवण म्हणून सोसायटी माध्यमातून प्रत्येक पुण्यस्मरण दिनानिमित्त कै. भाऊंना आदरांजली वाहण्यात येते. भाऊंचे कार्य महान आहे. निघोज सारखे बारा वाड्यांचे मोठ्या लोकवस्तीचे गाव हा कारभार करणे एवढे सोपे नाही मात्र कै. भाऊ यांनी सोसायटी व ग्रामपंचायत सरपंच व चेअरमन पद वर्षानुवर्षे बिनविरोध करीत लोकाभिमुख कारभार करीत जुन्या काळात गावचा विकास केला ही बाब तालुक्याच्या जनतेच्या दृष्टीने अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना सोसायटीचे माजी उपाध्यक्ष व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुका उपाध्यक्ष वसंतराव ढवण म्हणाले जुना काळ अत्यंत चांगला होता. सध्या मात्र निवडणुका बिनविरोध करणे शक्य होत नाहीत.



ठाणे, दिवा : श्री साई सेवक मंडळ, दातीवली आयोजित साई पालखीचे शिर्डीसाठी दिव्यातून प्रस्थान झाले प्रसंगी शेकडो साई भक्तांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती दिसून आली. गेली अनेक वर्षापासून दिव्यातील दातीवली गावातून सदर साई पालखी म्हात्रे गेट, गणेश नगर, चिन्मय गेट, आगासन मार्गे शिर्डीला पदयात्रेचे प्रस्थान होते असे साई सेवक मंडळाचे अध्यक्ष नामदेव नाईक यांनी स्पष्ट केले. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### साईनाथ विद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

वैजापुर (स. गांवकरी) : पारळा (ता. वैजपुर ) येथील साईनाथ विद्यालयात भारतीय संविधान दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथम संविधान दिनाबद्दल गावकऱ्यांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने विद्यार्थ्यांनी हातात घोषवाक्यांचे फलक, तरुणाईत प्रबोधन जागवणाऱ्या घोषणा देत गावातील मुख्य मार्गांवरून फेरी काढली. त्यानंतर भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रथम विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी आणि उपस्थित मान्यवरांनी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून लोकशाही मूल्यांप्रती निष्ठा व्यक्त केली.संविधान आपल्याला दिलेले मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये याबाबत सहशिक्षक सोनवणे सर यांनी विद्यार्थ्यांना अतिशय सखोल व समजावून सांगणारे मार्गदर्शन केले.तसेच भारतीय संविधानाचे महत्त्व, त्यातील वैशिष्ट्ये व डॉ. आंबेडकरांचे योगदान यावर मुख्याध्यापक भिवसणे सर यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्व, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान या विषयी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी संविधान दिनानिमीत्त चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सर्जनशीलता, राष्ट्रभाव आणि संविधान मूल्यांची जाण यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या चित्रांमध्ये सादर केला.सहशिक्षक भाऊसाहेब सोमासे, कृष्णा चव्हाण,ज्ञानेश्वर गायकवाड, शिवाजी गोल्हार, शांताराम चव्हाण, भाऊसाहेब गायकवाड यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहभाग दिला. कार्यक्रमासाठी सरपंच गणेश आहेर, मच्छिंद्र सोनवणे, कैलास आहेर यासह पालक उपस्थित होते.

### शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हा दंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३७(१)(३) अन्वये ४ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात शस्त्रबंदी आणि जमावबंदी आदेश लागू करण्याचे आदेश जारी केले आहेत. धार्मिक कार्यक्रम, लग्नसमारंभ, मिरवणुका आणि प्रेतयात्रांतील जमावावर हा आदेश लागू होणार नाही. तसेच पोलीस अधिकारी, कर्तव्यावर असलेले शासकीय अधिकारी व कर्मचारी आणि सभा किंवा मिरवणूक काढण्यासाठी रीतसर परवानगी घेतलेल्या व्यक्तींनाही या आदेशातून सूट राहील. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

### मतदान केंद्र असलेल्या शाळांना १ व २ डिसेंबर रोजी सुट्टी जाहीर

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : नगर परिषद व नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका २०२५ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी मतदान केंद्र म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या सर्व शाळांना दि. १ व २ डिसेंबर २०२५ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. यासंदर्भातील आदेश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया (भा.प्र. से.) यांनी निर्गमित केले आहेत. जिल्ह्यातील ११ नगर परिषद व एका नगरपंचायतीमध्ये २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान तर ३ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी होणार आहे. यामध्ये संगमनेर, कोपरगाव, शिर्डी, राहाता, राहुरी, देवळाली प्रवरा, श्रीरामपूर, पाथर्डी, शेवगाव, जामखेड व श्रीगोंदा नगरपरिषद तसेच नेवासा नगरपंचायत या ठिकाणांचा समावेश आहे. मतदानाच्या पूर्वतयारीसाठी निवडणूक अधिकारी व कर्मचारी दि. १ डिसेंबर रोजीच मतदान केंद्रांवर दाखल होणार असल्याने संबंधित शाळा पूर्णतः निवडणूक प्रशासनाच्या ताब्यात उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे दि. १ डिसेंबर व मतदानाच्या दिवशी २ डिसेंबर २०२५ रोजी संबंधित शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत, पारदर्शक व सुरळीत पार पडावी, या उद्देशानेच ही सुट्टी जाहीर करण्यात आल्याचे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

### प्रौढांसाठी भारतातील पहिली संपूर्ण एकीकृत वेलनेस इकोसिस्टम




मुंबई (स. गांवकरी) : सिरीअल उद्योजिका तनूरा स्वेथा मेनन यांनी वेलनेस आयकॉन आणि फिटनेस चॅम्पियन सुनील शेट्टी यांच्या सोबत AgeWell च्या सुरुवातीची घोषणा केली आहे. 40 वर्षांवरील प्रौढांसाठी खास बनवण्यात आलेली ही भारतातील पहिली संपूर्ण वेलनेस इकोसिस्टम असून यात अँटी-एजिंग उत्पादने, हेल्दी एजींग सोल्यूशन्स आणि लॉन्जेव्हिटी (दीर्घायुष्य) केंद्रित कम्युनिटी प्लॅटफॉर्म्सना एकत्र आणण्यात येत आहे. AgeWell हे फक्त उत्पादनांचे लॉन्च नाही, तर सह-संस्थापक तनूरा स्वेथा मेनन, मितलाज आणि शाहिन फर्झीन यांच्या आयुष्याच्या अनुभवांवर आधारित राष्ट्रीय आरोग्य चळवळीची सुरुवात आहे. त्यांनी भारतीय ज्येष्ठांच्या विशेष गरजा, हुकलेल्या संधी आणि उणीवा यांचा जवळून अनुभव घेतला असून प्रत्येक कुटुंबासाठी एकीकृत इकोसिस्टम उभारली आहे.

# पारनेरमध्ये शनिवारी 'सन्मान गुणवंत गुरुजनांचा'

- माजी प्राचार्य डॉक्टर विद्याधर औटी (सर) आणि ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांना जीवनगौरव पुरस्कार.
- सावित्री... फातेमा सदभावन मंच पारनेर यांचे आयोजन



पारनेर : (समर्थ गांवकरी)

शिक्षणाच्या पवित्र कार्यात आपले मोलाचे योगदान देणाऱ्या मान्यवरांना जीवन गौरव पुरस्कार आणि पारनेर तालुक्यातील गुणवंत प्राथमिक शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी सावित्री-फातेमा सदभावना मंच, पारनेर यांच्या वतीने एका भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

'सन्मान गुणवंत गुरुजनांचा' या नावाने होणारा हा सोहळा शनिवार, दि. २९ रोजी सकाळी १०.३० वाजता, आनंद लॉन्स, पारनेर येथे संपन्न होणार आहे.या कार्यक्रमाच्या निमित्ताने शिक्षण आणि अध्यात्म यांचा संगम पाहायला मिळणार आहे. या वेळी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांचे 'संत आणि शिक्षणाची महत्ता' या विषयावर प्रबोधनपर प्रवचन होणार आहे. महाराजांचे मार्गदर्शन उपस्थित शिक्षक आणि नागरिकांना प्रेरणा देणारे ठरेल.सावित्री-फातेमा सदभावना मंचने समाजातील दोन महत्त्वपूर्ण व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्याचा निर्णय घेतला आहे. राष्ट्रीय कीर्तनकार आणि

समाजप्रबोधनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे आणि पारनेरचे भूमिपुत्र, शिक्षण क्षेत्रात अमूल्य योगदान देणारे प्राचार्य डॉ. विद्याधर औटी (सर) यांना त्यांच्या जीवनकार्याबद्दल जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.प्राचार्य डॉ. विद्याधर औटी यांनी पारनेर तालुक्याचे नाव शिक्षण क्षेत्रात मोठे केले आहे, तर ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य अविरतपणे सुरू ठेवले आहे. त्यांच्या या सन्मानाने उपस्थित सर्वांना प्रेरणा मिळेल यात शंका नाही.या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला प्रशासकीय व शिक्षण क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित राहणार आहेत. त्यांची उपस्थिती या सोहळ्याला विशेष उंची प्राप्त करून देईल. या महत्वपूर्ण कार्यक्रमासाठी संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे, महाराष्ट्र राज्य डॉ. महेश पालकर,मुख्यमंत्री यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य, देवराम पळसकर,शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद अहिल्यानगर, भास्कर पाटील

यांच्यासह इतर अधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सावित्री-फातेमा सदभावना मंच, पारनेर यांनी तालुक्यातील आणि पंचक्रोशीतील सर्व नागरिकांना या प्रेरणादायी सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे विनम्र आवाहन केले आहे.

### गुणवंत शिक्षक पुरस्कर्ते

मल्हारी रेपाळे ( जि. प. शाळा पुणेवाडी), शगुफा शेख ( जि. प. शाळा, कण्हेर ओहळ), गोरक्ष पावडे ( जि. प. शाळा, पाबळ लोणी हवेली), वैशाली औटी ( जि.प शाळा पाडळी दर्या), सचिन ठाणगे,( जि.प शाळा धोत्रे बुद्रुक,), सतीश नरसाळे ( जि.प.शाळा ढवळपुरी), हिराबाई लटांबळे ( जि. प. शाळा अळकुटी),ज्ञानेश्वर जाधव (जि.प शाळा शिंदे मळा, वडगाव सावताळ), वृषाली गायकवाड ( जि.प.शाळा राळेगण सिद्धी), सतीश भालेकर ( जि.प.शाळा पिंपरी जलसेन) आदीचा समावेश आहे.

# कॅसाग्रँडची १,००० कर्मचाऱ्यांना लंडन सहलीची भेट

चेन्नई : (समर्थ गांवकरी)

आपल्या यशामध्ये कर्मचाऱ्यांना सर्वात महत्त्वाचे स्थान देणाऱ्या कार्यसंस्कृतीचे पालन करत, भारतातील आघाडीच्या रिअल इस्टेट डेव्हलपर्सपैकी एक असलेल्या कॅसाग्रँड कंपनीने आपल्या 1,000 कर्मचाऱ्यांना आठवडाभराची पूर्ण प्रायोजित लंडन सहल भेट देऊन आनंदित केले. ही सहल कंपनीच्या वार्षिक कर्मचारी पुरस्कार उपक्रम 'प्रॉफिट शेअर बोनान्झा' अंतर्गत आयोजित करण्यात आली होती. या प्रॉफिट शेअर बोनान्झा उपक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत 6,000 हून अधिक कर्मचाऱ्यांनी सिंगापूर,

CASAGRAND building aspirations

थायलंड, मलेशिया, दुबई, स्पेन आणि इतर अनेक देशांमध्ये प्रवास केला आहे. अनेक कर्मचाऱ्यांनी या सहलींना त्यांच्या आयुष्यात बदल घडवणारे आणि प्रेरणा देणारे अनुभव म्हटले आहे. दरवर्षी हा उपक्रम अधिक मोठ्या प्रमाणावर राबवला जातो, कारण कंपनीला विश्वास आहे की तिचे यश कर्मचाऱ्यांमुळे शक्य आहे आणि त्यामुळे त्यांच्यासोबत हे यश खास पद्धतीने साजरे केले पाहिजे.

# तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी अशोक आहेर

- उपाध्यक्षपदी शिवाजी आंबरे यांची निवड!
- गणोरे ग्रामसभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न!



गणोरे (ता. अकोले) : (समर्थ गांवकरी)

गणोरे येथे २६ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या ग्रामसभेत सर्व विषयांवर सविस्तर आणि पारदर्शक चर्चा होऊन ग्रामसभा उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी अशोक गंगाधर आहेर यांची, तर उपाध्यक्षपदी शिवाजी रामचंद्र आंबरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच संतोष आंबरे होते. उपसरपंच प्रदीप भालेराव, ग्रामपंचायत अधिकारी बलसाने, सोसायटीचे अध्यक्ष अशोक आहेर, ज्येष्ठ शिक्षक संजय नवले, कामगार तलाठी अमोल गडाख, कृषी सहाय्यक तळपे, प्रताप आंबरे, रावसाहेब आहेर, पोपट आहेर, छाया आहेर, अंबादास दातीर, गणपत दातीर, अनिल आंबरे (अंबिका माता ट्रस्ट अध्यक्ष), संदीप आंबरे, संजय आंबरे, ग्रामपंचायत सदस्य, आरोग्य सेविका, वायरमन देशमुख, संजय दातीर, राजेंद्र आंबरे, बाळू आहेर सर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेत २०२६-२७ या वर्षासाठी ग्रामपंचायतीचा जीपीटीपी आराखडा तयार करण्यात आला. अंदाजपत्रकाचे वाचन तसेच घरपट्टी व पाणपट्टी थकबाकी वसुलीचा आढावा घेण्यात आला.

शंभर टक्के वसुलीसाठी प्रकरणे लोकअदालतमध्ये पाठविण्याबाबत चर्चा झाली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान प्रभावीपणे राबविणे आणि शासन निर्णयानुसार थकबाकी वसुलीत सवलत देण्याचा ठराव सभेत मंजूर करण्यात आला.

# महिलांची सुरक्षा आणि बिलोली शहराच्या विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या हातात सत्ता द्या

बिलोली : (समर्थ गांवकरी)

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा फुले,शाहू, आंबेडकरांच्या विचारांवर चालणारा पक्ष आहे. सर्वजातीधर्मांचा विचार करणारा पक्ष असून राष्ट्रवादीचे नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली बिलोली शहराच्या विकासा सोबतच महिलांच्या सुरक्षेसाठी आम्ही बांधील आहोत.गेल्या दोन वर्षांच्या काळात अजित पवार यांच्या मार्फत गेल्या दोन वर्षांच्या काळात अल्पसंख्याक समाजाला सर्वाधिक निधी मिळाला असून बिलोली



नगर परिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्ता आल्यास आमच्या वचनामतील सर्व कामे करण्यास आम्ही तत्पर आहोत.असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी केले.ते काल दि.26 नोव्हेंबर रोजी बिलोली नगर परिषद निवडणूकीच्या अनुषंगाने शहरातील गांधी चौक येथे आयोजित प्रचार सभेत बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री नवाब मलिक, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकनकर,माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर,माजी आमदार मोहन हांबर्डे, सुभाष साबणे, अविनाश घाटे, प्रदेश उपाध्यक्षा मिनलताई पा खतगावकर, जिल्हाध्यक्ष शिवराज पा.होटाळकर,माजी नगराध्यक्ष यादवराव तुडमे, यांच्यासह बिलोली नगराध्यक्ष पदाचे उमेदवार इंद्रजित तुडमे, कुंडलवाडी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विठ्ठल कुडमुलवार यांच्यासह राष्ट्रवादीचे कॉंग्रेस पक्षाच्या नगरसेवक पदांचे उमेदवार व पदाधिकारी उपस्थित होते. या प्रचार सभेस संबोधित करताना माजी मंत्री नवाब मलिक यांनी काँग्रेसवर हल्ला चढवत आजपर्यंत काँग्रेसने वारंवार मुस्लिम समाजाचे मत घेण्याचे काम केले पण मुस्लिम समाजाला न्याय देण्याची भूमिका ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची असल्याचे सांगून राष्ट्रवादीलाच मतदान करण्याचे आवाहन केले. तर महिलांना सक्षम बनविण्यासाठी राज्यात लाडकी बहिण,लेक लाडकी अशा अनेक योजना राबविल्या जात आहेत.नांदेड मध्ये आल्यापासून येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्याने महिला सन्मान, मातृशक्तीचा सन्मान केल्याचे दिसून येत आहे त्यामुळे महिला भगिनींनी राष्ट्रवादीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याच्या आवाहन राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष रूपालीताई चाकणकर यांनी केले. या सभेस माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर,माजी आमदार सुभाष साबणे, श्रुती तुडमे, माधवराव अंकोशकर यादींनी संबोधित केले.तर नगराध्यक्ष पदाचे उमेदवार इंद्रजित तुडमे यांनी शहराच्या विकासासाठी मी व आमचे सर्व उमेदवार चोवीस तास उपलब्ध राहुन बिलोली शहराच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले. यावेळी शहरातील शेकड माता-भगिनींनसह नागरिकांचे व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# नागवडे लॉ कॉलेजमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)

नागवडे येथील लॉ कॉलेजमध्ये भारतीय संविधान दिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अंजूला चौबे या उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेच्या सामूहिक वाचनाने करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे संविधानाची प्रस्तावना वाचत लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद तसेच राष्ट्राची एकात्मता टिकवून ठेवण्याची शपथ घेतली. कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी संविधानातील मूल्यांप्रती



आपली निष्ठा व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अंजूला चौबे म्हणाल्या, "संविधान हा केवळ कायद्याचा दस्तऐवज नसून तो स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा मजबूत पाया आहे. देशातील प्रत्येक नागरिकाला समान न्याय व समान संधी देण्याचे कार्य संविधान करते. मूलभूत अधिकारांसह मूलभूत कर्तव्यांची जाणीव ठेवून लोकशाहीची जपणूक करणे ही युवा पिढीची महत्त्वाची जबाबदारी आहे," असे त्यांनी नमूद केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी संविधानातील मूलभूत अधिकार, संघीय रचना, नागरी हक्कांचे संरक्षण, स्वातंत्र्यावर असलेले निर्बंध आणि सामाजिक न्याय यासारख्या विषयांवर आपली मनोगते व्यक्त केली. प्रा. पुरुषोत्तम फाटे, प्रा. साक्षी प्रथमशेट्टी, तसेच प्रा. रुपाली गोळे यांनी संविधानातील विविध कलमे व त्यांचा दैनंदिन जीवनातील उपयोग यावर सविस्तर मार्गदर्शन केले. संविधान निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले अमूल्य योगदान यावेळी विशेषत्वाने अधोरेखित करण्यात आले.

या कार्यक्रमास महेश शिरसागर, सतीश जामदार, राहत शेख, विशाल रणदिवे, रुपेश पोखरणा, भारतीय काळे, तृप्ती बोडके, साक्षी मचाले, वर्षा जामकर, पंकज गणवीर, महेश गायकवाड, विश्वास झगडे, अजय बापकर यांच्यासह अनेक प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन भारती काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन साक्षी मचाले यांनी मानले.

# राज्यघटनेच्या जन्माची ६० वर्षे!



## संपादकीय

ब्रिटिशांच्या वसाहतीपासून देश स्वतंत्र करण्याच्या संघर्षाला समांतर असा भारतीय घटनेच्या निर्मितीचा इतिहास आहे. १८८९ मध्ये होमरूल योजना आणली गेली, तेव्हापासून घटनेच्या प्रवासाला सुरुवात झाली. अज्ञात व्यक्तीने हे विधेयक तयार केले होते. त्याचेच वर्णन श्रीमती ॲनी बेझंट यांनी 'होमरूल विधेयक' असे केले आणि 'भारतीय राज्यघटना विधेयक १८९५' नावाने ते सादर झाले. भारतीय राज्यघटनेची रूपरेषा स्पष्ट करण्याचा तो पहिला अधिकृत प्रयत्न होता. १९१४ साली गोपाळ कृष्ण गोखले यांनी युद्धोत्तर सुधारणांविषयी एक मसुदा तयार केला. 'गोखले यांची राजकीय सनद' म्हणून तो ओळखला जातो. १९१५ साली जीना यांच्या पुढाकाराने काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांच्या अधिवेशनात सुधारणांसाठी सरकारवर दबाव टाकण्याकरिता संयुक्त योजना तयार करावी, असे ठरवण्यात आले. पुढच्या वर्षी लखनऊ आणि कलकत्त्यात भरलेल्या अधिवेशनात काँग्रेस आणि लीगने 'काँग्रेस लीग योजना' म्हणून ओळखला जाणारा मसुदा मंजूर केला. भारताचे स्वतःचे सरकार असण्याच्या योजनेची ती रूपरेषा होती. भारतीयांच्या हातून तयार झालेल्या कायद्याच्या आधारावर एतद्देशीयांची राजवट आणण्याविषयी चर्चा सातत्याने सुरू होती. स्वयंनिर्णयाचा ठराव काँग्रेसने केला तो १९१८ साली. 'स्वराज : देशाची मागणी' हा लेख महात्मा गांधी यांनी १९२४ साली लिहिला. १९२५ साली मोतीलाल नेहरू यांनी राष्ट्रीय मागणी दुरुस्ती सादर केली. त्याच वर्षी कॉमनवेल्थ ऑफ इंडिया विधेयक मांडले गेले. १७ मे १९२७ रोजी मोतीलाल नेहरू यांनी काँग्रेसच्या मुंबई अधिवेशनात ठराव मांडून घटना तयार करण्यासाठी कार्यकारी समिती नेमण्याची विनंती केली. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने सादर केलेल्या 'नेहरू अहवाला' त ८७ कलमे होती. मूलभूत हक्क, नागरिकत्व, संसद, प्रांतिक विधिमंडळ, न्यायव्यवस्था तसेच दुरुस्त्यांची तरतूद या विषयांवर प्रकरणे होती. भारतीय स्वतःसाठी घटना तयार करू शकतात, त्यासाठी ब्रिटिशांची मदत लागत नाही हे या मसुद्याने दाखवून दिले. काँग्रेसच्या फैजपूर अधिवेशनाने घटनासभेच्या निवडणुका घेण्यासंबंधी ठराव केला.



१९३९ साली महात्मा गांधी यांनी 'केवळ एकच मार्ग' हा लेख लिहून घटनासभेची गरज प्रतिपादन केली. अंतिमत: १९४० साली व्हाइसरॉय लिनलिथगो यांनी 'ऑगस्ट अधिकारा' च्या माध्यमातून प्रथमच या मागणीवर विचार केला. त्यानंतर ब्रिटनचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी भारतीयांसाठी घटना तयार करण्याची मागणी स्वीकारणारे निवेदन ब्रिटिश संसदेत केले. शेवटी ४ डिसेंबर १९४५ रोजी भारतात घटनानिर्मिती करणारे मंडळ स्थापण्यात येत असल्याची घोषणा परराष्ट्रमंत्र्यांनी केली. घटनासभेच्या २९६ जागांसाठी जुलै १९४६ मध्ये निवडणुका घेण्यात आल्या. सर बी. एन. राव हे भारतीय सनदी सेवा परीक्षा उत्तीर्ण झालेले ब्रिटिश नोकरशहा होते.'

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ४९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4 | | | 1 | | 3 | | 2 |
| | | 7 | | | 4 | | | 5 |
| 2 | 5 | | | 9 | 6 | 7 | 1 | |
| | | | | | | 6 | | 7 |
| 5 | | | 6 | 2 | 3 | | | 8 |
| 4 | | 2 | | | | | | |
| | 2 | 1 | 9 | 4 | | | 3 | 6 |
| 9 | | | 3 | | | 2 | | |
| 6 | | 5 | | 7 | | | 8 | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ४८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 4 | 6 | 1 | 9 | 7 | 2 | 5 | 8 |
| 1 | 9 | 8 | 2 | 5 | 3 | 6 | 7 | 4 |
| 7 | 5 | 2 | 8 | 6 | 4 | 9 | 1 | 3 |
| 6 | 8 | 9 | 5 | 7 | 1 | 4 | 3 | 2 |
| 4 | 3 | 1 | 6 | 2 | 9 | 7 | 8 | 5 |
| 2 | 7 | 5 | 3 | 4 | 8 | 1 | 6 | 9 |
| 5 | 6 | 3 | 9 | 1 | 2 | 8 | 4 | 7 |
| 9 | 1 | 7 | 4 | 8 | 5 | 3 | 2 | 6 |
| 8 | 2 | 4 | 7 | 3 | 6 | 5 | 9 | 1 |

### पंचांग

| | | |
|---|---|---|
| पंचांग | संवत्सर – विश्वावसूनाम | २४:१५:४०+ |
| २८ नोव्हेंबर २०२५ | अयन- दक्षिणायान | नक्षत्र:शतभिषा |
| शुक्रवार | मास- मार्गशीर्ष | २६:४९:२६+ |
| विक्रम संवत्- २०८२ | ऋतु- सौर हेमंत | योग:व्याघात ११:०४:५७ |
| मार्गशीर्ष शके | शुक्ल पक्ष | करण:विष्टि १२:२८:३४ |
| संवत्- १९४७ | तिथि:अष्टमी | करण:बव २४:१५:४०+ |

## उपदेशाचे डोस

### महापुरुष

आधुनिक संत म्हणून ज्यांना संबोधण्यात येते ते आचार्य विनोबा भावे यांच्या संदर्भातील एक गोष्ट अशी की, आपले म्हणणे दुसऱ्यांना न दुखवता मोठ्या खुबीने आचरणाने पटवून देण्यात त्यांचा हातखंडा होता. एके दिवशी असाच एक माणूस त्यांच्याकडे आला व पश्चात्तापदग्ध होऊन म्हणाला, महाराज दारु काही मला सोडायलाच तयार नाही. मला माहिती आहे की ती सवय वाईट आहे. मला ती सवय सोडायची आहे पण काय करु ? आचार्य शांतपणे म्हणाले, असे कर, तू उद्या मला याचवेळी येऊन भेट व बाहेरुनच हाक मार. मी मग येऊन सांगेन काय ते ! दुसऱ्या दिवशी तो माणूस ठरल्याप्रमाणे आला पण त्याला कळेना की बाहेरुनच का हाक मारायची? पण आचार्यांची आज्ञा म्हणून अधिक विचार न करता त्याने बाहेरुनच हाक मारुन स्वत: आल्याचे सांगितले. तोच आतून आचार्यांचा आवाज आला, होय रे, मी बाहेर येऊ पाहतोय, पण हा खांबच मला सोडायला तयार नाही. तो माणूस चक्रावून गेला. ही काय भानगड आहे ? आचार्य माझी गंमत तर करत नाहीत ? असा विचार करुन त्यांनी आत कुतूहलाने डोकावून पाहिले. तो त्याला हसूच आवरेना. घरातील खांबाला विनोबाजी घट्ट पकडून बसले होते व तो खांब मला सोडत नाही म्हणून तक्रार करत होते. तो माणूस हात जोडून म्हणाला, विनोबाजी आपणच खांबावर चढून त्याला धरले आहे. व तो खांब सोडत नाही, हे कसे ? हे ऐकूण स्मितहास्य करत खाली उतरले व त्याला समजावणीच्या स्वरात म्हणाले, ज्याप्रमाणे मी या खांबाला धरुन ठेवले होते तसेच तू ही दारुला पकडून ठेवले आहेस. दारुने तुला नाही पकडले. जेव्हा तू दारु सोडायचे ठरवशील तेव्हा आपोआप दारु पिच्छा सोडेल. हे ऐकून त्या माणसाचे डोळे उघडले व त्यांनी विनोबाजींच्या पायावर डोके ठेवून दारु सोडण्याचा निश्चय केला.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६०० – इंग्लंडमध्ये ज्ञानोपासक मंडळींनी एकत्र येऊन रॉयल सोसायटीची स्थापना केली.
- १९२९ – दक्षिण ध्रुवावर पहिले विमान उतरले. रिचर्ड बोएर्डने या विमानाचे सारथ्यकर्म केले. तिथे साथीदारांसह एक दिवस राहून ते परतले.
- १९४३ – दुसऱ्या महायुद्धातील पुढचे डावपेच आणि रशियाला करायची मदत यांच्यासाठी तेहरान येथे रुझव्हेल्ट, चर्चिल व स्टॅलिन यांची भेट.

### राष्ट्रीय

- १५६१ – महाराष्ट्रातील एक सत्पुरुष मोरया गोसावी यांनी जिवंत समाधी घेतली.
- १९९७ – आय.के. गुजराल सरकार काँग्रेसने पाठिंबा काढून घेतल्यामुळे कोसळले.
- २००४ – नाशिकच्या विमान कारखान्यात पहिले सुखोई-३० मार्कवन् हे विमान बांधून तयार झाले. ते चाचणीनंतर भारतीय हवाईदलात दाखल.

### जन्म

- १८६७ – चंद्रकुमार अग्रवाल, आसाममधील महान कवी.
- १९१९ – दुसऱ्या महायुद्धनंतरच्या ब्रॅडमनच्या अजिंक्य ऑस्ट्रलियन संघातील महान अष्टपैलू सदस्य कीथ मिलरचा जन्म. तो दुसऱ्या महायुद्धात वैमानिक म्हणून लढला.

### निधन

- १८९० – महात्मा ज्योतीबा फुले, महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक यांचे निधन.
- १९६७ – पांडुरंग सदाशिव सेनापती बापट यांचे निधन.
- २००७ – राजेंद्र धारकर, वरिष्ठ भाजपा नेते आणि इंदूरचे माजी महापौर.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ४९



**आडवे शब्द**

१. उगीच
५. पावलोपावली
८. मनसोक्त, समाधान होईल इतके
११. जनावरांचे ओरडणे
१२. लहान
१३. गंध
१५. घरोघर
१७. दहा तोंडाचा, दशमुखी
१९. गवंड्याकडील पाणी वाहून नेण्याची कातडी पिशवी
२०. एक अजस्त्र, हिंस्त्र जलचर
२१. कन्या, पुत्री
२३. आकार-उंची-वयाने कमी
२५. सर्प
२६. बाळभाषेत पाणी
२७. कंड
२९. मृत्यू, वेळ
३०. गुणाकार, सोंगट्या मांडण्याचे वस्त्र
३२. परीक्षा घेणारा
३५. वेतन
३८. टाळ्यांचा आवाज
४१. कैफी, नशा आणणारा
४३. निराश
४४. हात, हस्त
४५. शंभर पैशाचे नाणे
४७. नाल्यावरील पूल
४९. प्रेत, कलेवर
५०. थरथरणारा आवाज
५१. केर
५४. धुसफूस, जीवाला होणारा त्रास
५६. मनाला टोचणारे दुःख
५८. प्रजाजन, देशाचा रहिवासी
६०. साडेसातीचा ग्रह
६२. बंदुकीची फैर
६३. पर्वणी, सणाचा दिवस
६४. रंग
६५. अटीची भाषा
६७. कामाचे कोष्टक
६९. टाळाटाळ, चुकवाचुकव
७०. निकट
७२. मीठाचा चव
७४. फाटलेल्या दधाच्या वड्या
७५. सकस
७७. उत्सव
७८. पंकज, सरोज
८०. नवरा (ग्रा.)
८१. समीक्षा, शेरेताशेरे
८२. दरवाजा
८३. लाकडी पादुका
८४. आदर सत्कार
८६. आजच्या आधीचा दिवस
८८. तोफगाडी
८९. नम्रता
९०. परत पाठविणे

**उभे शब्द**

१. स्त्री भूत
२. सारा, टॅक्स
३. चौक
४. विड्याचे टोकदार पान
५. पटल
६. आर्धी ओंजळ
७. दीनांवर दया करणारा, परमेश्वर
८. मदनाचे एक शस्त्र
९. बोलता येत नाही असा
१०. रुग्णालय
१४. अखंड
१६. निमग्न, रममाण
१८. पुरुष
२०. अडकित्त्याने कातरण्याचे फळ
२२. असंमती
२४. कपडालत्ता
२६. पाप करण्यास घाबरणारा
२८. सततचे नामस्मरण
३१. रोखलेली नजर
३३. माफी मागणे
३४. रेशमी वस्त्र
३६. गर्दभ
३७. इंद्राचा हत्ती
३९. टपाल
४०. फळावरील साल
४२. कशा प्रकारचा?
४३. नष्ट होणे
४६. साखरेचा रस
४८. सोने
५०. संध्याकाळ
५२. संताप, क्रोध
५३. निर्लज्ज
५५. झाकण असलेले पात्र
५६. सगळीकडे
५७. प्राण
५९. निरुद्योगी
६१. नेहमी, नीती
६३. एक फळ
६५. छातीतील दाह
६६. रात्र
६८. उणीव भरून काढणे
६९. शर्त
७१. दिलेला आशीर्वाद
७२. संसद सदस्य
७३. तीव्र ऊन
७४. वारा, हवन
७५. कलावंत
७६. गर्दी, गजबज
७९. स्त्रियांची छेड काढणारा
८३. छोटा दगड
८४. आई
८५. झाडावर पिकलेले फळ
८७. वेल

**शब्दकोडे क्र. ४८ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.तोच चंद्रमा नभात तीच चैत्र यामिनी १०.व्यथा ११.रग १२.रात्र १४.भान १५.माती १६.नीच १७.विनाकारण १९.दिन २०.यक्ष २१.रसना २३.साल २४.राज २६.अवाजवी २९.महाराष्ट्र नवनिर्माण सेना ३१.हर ३२.सर्कस ३३.गीता ३४.नाक ३५.रग ३६.इतपत ३७.तोटा ३८.लड्डु ३९.तरतरीत ४०.तारा ४१.धनी ४३.राजा शिवाजी ४५.यथातथा ४७.तपास ४९.गज ५१.पर ५२.रम्य ५३.कसेल त्याची जमीन ५६.जम ५८.टवाळ ६०.सामना ६१.गर ६२. तमाशा ६३.फराळ ६४.पाप ६५.गदारोळ ६६.आपुलकी ६७.सर्वत्र ६८.हर ६९.आजी ७०.जस्त ७१.रमणी ७२.मौन ७३.परवा

उभे उत्तर : २.चलन ३.द्रव्यहीन ४.माथा ५.भारतीय जनता पक्ष,शिवसेना ६.तग ७.चराचर ८.चैत्र ९.यातना १३.घण १७.विना १८.काजवा २२.सहाण २३.साहस २४.राष्ट्रगीत २५.अनिल २६.अनाकलनीय २७.हजर २८.वीरगती २९.मसलत ३०.सेना ३६.इतराजी ३७.तोरा ३९.तळतळाट ४०.ताजी ४२.खातरजमा ४४.मगज ४६.थाप ४८.सरळ ५०.जमीनदार ५३.कमळ ५४.त्यागपत्र ५५.चीर ५७.मशालजी ५९.वास्तपुस्त ६०.सारा ६२.तळ ६३.फकीर ६४.पार्वती ६५.गहन ६६.आज ६९.आवा

# फ्लिपकार्ट फाउंडेशन आणि डब्ल्यूडब्ल्यूएफ-इंडियाकडून सक्षमीकरण

(समर्थ गांवकरी)



फ्लिपकार्ट ग्रुपची धर्मादाय शाखा असलेल्या फ्लिपकार्ट फाऊंडेशनने वर्ल्ड वाइड फंड फॉर नेचर - इंडिया (डब्ल्यूडब्ल्यूएफ-इंडिया) सोबत भागीदारी करून 'वसुंधरा मित्र - महाराष्ट्राच्या इको क्लबचे युवा संवर्धन प्रणेते' हा राज्यव्यापी पर्यावरण शिक्षण उपक्रम सुरू केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या वन विभागातील सामाजिक वनीकरण विभागाच्या पाठिंब्याने आयोजित या उपक्रमाचे उद्दिष्ट महाराष्ट्रातील तरुण, जबाबदार आणि कृतीशील पर्यावरणप्रेमी पिढीचे संगोपन करण्याचे आहे.

हा प्रकल्प १५ महिन्यांचा असून तो महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये राबवला जात आहे. त्यात इयत्ता ५ वी ते ९ वीपर्यंतचे १.५ लाख विद्यार्थी, ६,००० शिक्षक आणि मुख्याध्यापक (७२ मास्टर ट्रेनरसह) सहभागी करून घेतले जातील. या उपक्रमातून शाळा आणि आसपासच्या परिसरात पर्यावरण शिक्षण, शाश्वत पद्धती आणि युवा-नेतृत्वाखालील संवर्धन प्रयत्नांना चालना देणाऱ्या ३,००० ग्रीन स्कूल्स स्थापन केल्या जातील. त्याचा फायदा समाजातील सदस्य आणि कुटुंबांसह ९.३ लाखांहून अधिक व्यक्तींना होईल. नागपूर येथे ७ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी, डब्ल्यूडब्ल्यूएफ-इंडियाचे प्रतिनिधी आणि फ्लिपकार्ट फाउंडेशनच्या उपस्थितीत या उपक्रमाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. पर्यावरण शिक्षण आणि युवा-नेतृत्वाखालील संवर्धनासाठी राज्यव्यापी चळवळ उभारण्याच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. पुणे, ठाणे, नाशिक, संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती येथे आयोजित प्रशिक्षकांच्या प्रशिक्षण (टीओटी) कार्यशाळांमध्ये राज्यातील ३६ जिल्ह्यांतील शिक्षकांना सहभागी करून घेण्यात आले आणि शाळांमधील इको क्लबना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांना परस्परसंवादी शिक्षण मॉड्यूल आणि सुविधा तंत्रांनी सुसज्ज करण्यात आले.



ठाणे, दिवा : संविधान दिनानिमित्ताने दिव्यातील सखी महिला बचत गटातील महिलांना शिवसेना दिवा उपशहर प्रमुख तथा मा. नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांसकडून साडी वाटप करण्यात आले. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...

### एअरटेलच्या व्यवस्थापकीय संचालक गोपाळ विठ्ठल यांचे पत्र



■ प्राथमिक बँक खात्यातून यूपीआय पेमेंट केल्याने डिजिटल फसवणुकीचा धोका वाढतो

पुणे (स. गांवकरी) : भारतात मोठ्या प्रमाणात डिजिटल फसवणूकीच्या घटना उघडकीस आल्या आहेत. वाढत्या सायबर गुन्ह्यांचे केसेस पाहता भारती एअरटेलचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक गोपाळ विठ्ठल यांनी या सततच्या वाढत्या गुन्ह्यांबद्दल चिंता व्यक्त केली. या घटना आटोक्यात येण्यासाठी एअरटेलकडून राबवल्या जाणा-या आवश्यक उपाययोजनांबद्दल माहिती देण्यासाठी ग्राहकांना उद्देशून त्यांनी पत्र लिहिले आहे. आजकाल बनावट पार्सल डिलीव्हरीचे कॉल, फिशिंग लिंक्स आणि डिजिटल अरेस्ट आदी घोटाळे मोठ्या प्रमाणात घडत असताना एअरटेल आपल्या ग्राहकांच्या सुरक्षेसाठी पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर त्यांनी एअरटेल पेमेंट्स बँकेच्या सेफ सेकं अकाउंटची घोषणा केली. हे खाते ग्राहकांच्या मुख्य बँक खात्यापासून स्वतंत्र ठेवले जाते. यामुळे डिजिटल पेमेंटसाठी वापरण्यात येणारा पैसा सुरक्षित राहतो आणि कोणत्याही संभाव्य फसवणूकीपासून अतिरिक्त संरक्षण मिळते. "एअरटेल नेटवर्कमध्ये होणारे गुन्हे किंवा फसवणूकीच्या घटना आमच्यासाठी मोठी चिंतेची बाब आहे. ग्राहकांची सुरक्षितता हेच आमचे कायमस्वरुपी प्राधान्य राहील.",असे एअरटेलचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक गोपाळ विठ्ठल यांनी सांगितले. आपल्या ग्राहकांच्या डिजीटल देयकांच्या सुरक्षिततेसाठी एअरटेलकडून होणा-या उपाययोजनांचीही त्यांनी माहिती दिली. ते म्हणाले, "एअरटेल कंपनी अत्याधुनिक आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाचा उपयोग करुन ग्राहकांना स्पॅम कॉल आणि मेसेजबाबत कल्पना यावी याकरिता त्वरित अलर्ट देते. ग्राहकांनी चुकून एखादी लिंक क्लिक केली असेल तर ती लिंक ब्लॉक करण्याचीही सोय उपलब्ध करण्यात आली आहे. परंतु, आजच्या डिजिटल युगात आपले प्राथमिक बँक खाते किंवा इतर पेमेंट एप्लिकेशनशी जोडल्यास आपल्या बचतीला धोका निर्माण हो शकतो.", अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. हा धोका टाळण्यासाठी तसेच ग्राहकांचे पैसे सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांनी सेफ सेकंड अकाऊंट हा सुरक्षित आणि सोप्पा उपाय आता उपलब्ध करुन दिल्याचे ते म्हणाले.

### एशियन पेंट्सची क्रिकेटचा अधिकृत रंग भागीदार म्हणून भागीदारी

पुणे (स. गांवकरी) : देशभरात क्रिकेटचे आकर्षण सर्वोच्च स्तरावर असताना, भारतातील आघाडीचा रंग आणि डेकोर ब्रँड असलेल्या एशियन पेंट्सला भारतीय क्रिकेट नियामक मंडळा (बीसीसीआय) सोबत भारतीय क्रिकेटसाठी अधिकृत रंग भागीदार या नात्याने भागीदारीची घोषणा करताना अभिमान वाटतो. तीन वर्षांच्या या सहभागात भारतात खेळल्या जाणाऱ्या सर्व पुरुष, महिला आणि देशांतर्गत, 110 पेक्षा अधिक सामन्यांची व्याप्ती असणाऱ्या मालिका समाविष्ट असतील. हा सहभाग एशियन पेंट्सचा क्रिकेटशी असलेला संबंध अधिक मजबूत करतो आणि क्रिकेटमधील प्रत्येक रंगाच्या 1.4 अब्ज हृदयांना एकत्र आणतो. भारतीय घरांमध्ये रंग, सर्जनशीलता आणि भावना अनेक दशकांपासून साजरे करणारा ब्रँड या नात्याने, एशियन पेंट्सने आता देशातील सर्वात मोठे आकर्षण - क्रिकेट क्षेत्रात आपली चैतन्यशील उपस्थिती विस्तारली आहे. हा मोठ्या प्रभावाचा सहभाग प्रेरणा आणि अभिव्यक्तीच्या पारस्पारिक भावनेवर आधारित आहे जो भारतातील चाहत्यांना एकत्र करत, रंग आणि क्रिकेटमध्ये नाते जोडतो. धाडसी निर्णय ते चैतन्यमय अभिव्यक्तींपर्यंत, एशियन पेंट्स आणि भारतीय क्रिकेट हे दोन्हीही खरे नेतृत्व कसे असते ते प्रदर्शित करतात. यामुळे अब्जावधी हृदयांना जोडणाऱ्या रंगांचा उत्सव साजरा करणारी एक सशक्त भागीदारी सजीव होते!

### भारतात पॅनक्रियाटिक कॅन्सरग्रस्त रुग्णांपैकी फक्त 3% रुग्ण जगतात

asianpaints
OFFICIAL COLOUR PARTNER

पुणे (स. गांवकरी) : पॅनक्रियाटिक (स्वादुपिंडाचा) कॅन्सर हा सर्वात धोकादायक आणि वेगाने पसरू शकणाऱ्या कॅन्सरपैकी एक असून, भारतात याबाबत वाढती चिंता दिसून येत आहे. डॉक्टरांचे म्हणणे आहे की हा कॅन्सर बहुतेक वेळा खूप उशिरा लक्षात येतो आणि गेल्या अनेक वर्षांपासून त्याच्या उपचारांतही फारशी प्रगती झालेली नाही. रुबी हॉल क्लिनिकचे मेडिकल ऑन्कोलॉजी विभागप्रमुख डॉ. मिनीश जैन यांनी सांगितले की पॅनक्रियाटिक कॅन्सरग्रस्त रुग्णांचा पाच वर्षांचा जगण्याचा दर केवळ 3 टक्के असून, तो सर्व कॅन्सरमध्ये सर्वात कमी आहे. स्तनाचा किंवा फुफ्फुसाचा कॅन्सर यांसारख्या कॅन्सरमध्ये लवकर निदान, अधिक जागरूकता आणि जास्त उपचार पर्याय उपलब्ध असल्यामुळे परिणाम चांगले दिसतात. पण पॅनक्रियाटिक कॅन्सरकडे तितके लक्ष दिले गेलेले नाही. अनेक वर्षांपासून या आजारासाठी कोणताही नवीन मोठा उपचार उपलब्ध झालेला नाही. बहुतेक रुग्णांना पारंपरिक केमोथेरपीच दिली जाते, ज्याचा फारसा फायदा होत नाही. भारतात सुमारे 43 टक्के रुग्णांमध्ये हा कॅन्सर थेट स्टेज 4 मध्ये आढळतो, तेव्हा कॅन्सर शरीरात आधीच पसरलेला असतो आणि उपचार करणे खूप कठीण होते. ज्या रुग्णांवर शस्त्रक्रिया आणि कीमोथेरपी केली जाते, त्यांच्यामध्येही कॅन्सर परत येण्याची शक्यता जास्त असते, आणि त्यांचा जगण्याचा दर फक्त 12–15 टक्क्यांच्या आसपासच राहतो. डॉ. जैन यांनी सांगितले, "पॅनक्रियाटिक कॅन्सर अजूनही लोकांना नीट समजलेला नाही आणि त्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. जागरूकता, संशोधन आणि सरकारी मदत यांचा अभाव असल्यामुळे हा 'नेग्लेक्टेड कॅन्सर' म्हणून ओळखला जातो.

# डिजिटल अरेस्ट ऑनलाईन फसवणुक प्रकरणी सायबरची मोठी कारवाई

**तीन आरोपींना अटक**

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)



फसवणूक प्रकरणी गेल्या दि. ३१/१०/२०२५ रोजी फिर्यादी नामे संदिप हरिभाऊ कुलथे (रा. सावेडी, अहिल्यानगर) यांची दि. २४ नोव्हेंबर ते दि. २८नोव्हेंबर या दरम्यान वेगवेगळया मोबाईल नंबर वरुन फोन करुन व्हाट्सॲप द्वारे व्हिडीओ कॉल करुन फिर्यादी यांना मुंबई सायबर सेल मधुन बोलत आहे. असे सांगुन फिर्यादी यांचेविरुध्द मनि लॉड्रीग हवाला मनी ॲन्ड आयडेटी थेष्ट केस संदर्भात खोटे सांगुन फिर्यादी यांची फसवणुक करण्याकरीता डिजिटल अटक करुन फिर्यादी यांची ८,८०,०००/- रु.ची फसवणुक केली आहे, वगैरे मजकुरचे फिर्यादीवरुन सायबर पोलीस स्टेशन अहिल्यानगर येथे गु.रजि.नं.१३/२०२५ भा. न्या. सं. ३१८(४).३३६ (३), ३४० (२) सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

वरील प्रमाणे गुन्हा दाखल झाल्याने गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा.श्री. सोमनाथ घार्गे साहेब पोलीस अधिक्षक, अहिल्यानगर यांनी श्री. सागर ढिकले पोलीस निरीक्षक सायबर पोलीस स्टेशन अहिल्यानगर यांना सदर गुन्हयाचा बारकाईने व सखोल तपास करुन गुन्हा उघडकीस आणणेबाबत सुचना व मार्गदर्शन केले. त्यानुसार सदर गुन्हयाचे तपासकामी श्री. सागर ढिकले पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, अहिल्यानगर यांचे अधिपत्याखाली सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक सुदाम काकडे, पोहेकॉ मल्लिकार्जुन बनकर, पोहेकों दिगंबर कारखेले, पोहेकॉ उमेश खेडकर, पोहेकॉ निळकंठ कारखेले, पोहेकॉ रावसाहेब हुसळे यांनी तांत्रिक व कौशल्यपुर्ण तपास करुन सदर गुन्हयातील आरोपी निष्पन्न करुन पथकातील वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी निष्पन्न आरोपीपैकी आरोपी नामे १) विजय रंगनाथ चेमटे (रा-भाळवणी ता-पारनेर जि-अहिल्यानगर), २) अभिजित अजिनाथ गिते (रा-दादेगांव ता-आष्टी जि-बीड हल्ली रा-प्रतिक प्लाझा, JSPM कॉलेज शेजारी नऱ्हे, पुणे), ३) अक्षय संजय तांबे (रा-सलाबतपुर ता-नेवासा जि-अहिल्यानगर, हल्ली रा-द्वारका पॅलेस लक्ष्मी चौक दत्त कॉलनी हिजवडी फेज वन, पुणे) यांना ताब्यात घेण्यात आले असुन सदर गुन्हयाचे अनुषंगाने यांचेकडे अधिक चौकशी करता त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली असुन सदर गुन्हयाचे अनुषंगाने अधिक तपासकामी त्याना नमुद गुन्हयात अटक केले आहे.

या आरोपी मा. न्यायालयात हजर केले असुन सदर आरोपी यांना येत्या दि. २९ नोव्हेंबर पर्यंत पो. कं. रिमांड मंजुर केली आहे. आरोपी यांचेकडुन आणखी इतर काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास श्री. सागर ढिकले पोलीस निरीक्षक सायबर पोलीस स्टेशन अहिल्यानगर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.श्री. सोमनाथ घार्गे साहेव पोलीस अधिक्षक अहिल्यानगर, मा.श्री. वैभव कलुबर्मे अपर पोलीस अधिक्षक, अहिल्यानगर, मा.श्री. दिलीप टिपरसे साहेब उपविभागीय पोलीस अधिकारी नगर शहर विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. सागर ढिकले, पोलीस उप निरीक्षक सुदाम काकडे, पोहेकॉ मल्लिकार्जुन बनकर, पोहेकों दिगंबर कारखेले, पोहेकॉ उमेश खेडकर, पोहेकॉ निळकंठ कारखेले, पोहेकॉ रावसाहेब हुसळे, पोकॉ अमोल आव्हाड यांचे पथकाने केलेली आहे.

# गेट सेट लर्न तर्फे मिशनमध्ये करण्यात आली वाढ

नंदुरबार : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील उत्तरे कडील आदिवासी जिल्हा असलेल्या नंदूरबार जिल्ह्या मध्ये डोंगरदऱ्या, एकजूट समाज आणि आपुलकीची भावना आपल्याला दिसून येते. भिल आणि पवरा जमातींनी अगदी आपुलकी ने त्यांच्या प्राचीन भाषा, पंरपरा आणि हस्तकला पिढ्यान पिढ्या जपल्या आहेत. त्यांच्या शाळा सर्वसाधारणपणे उघड्यावरच असतात, सुविधांच्या अभावामुळे नव्हे तर भुगोलच लोकांचे जीवन, प्रवास आणि शिक्षणाची पध्दती ठरवत असतात. अनेक विद्यार्थ्यांसाठी शाळेत जाणे म्हणजे एक संकल्प असतो, कारण खूप दूरवर चालावे लागणे, विविध भाषांमधील संभाषण आणि एमेकांची पुस्तके वापरणे ही रोजचीच बाब असते. काही भागात तंत्रज्ञान हे पोहोचू शकत नाही, केवळ कौशल्य किंवा इच्छा नसते असे नव्हे तर नंदुरबार हा जिल्हा वैविध्याने नटलेला असा जिल्हा आहे म्हणून. अशा ठिकाणीच आशा पल्लवीत होत असतात. अरविंद मफतलाल ग्रुप च्या सहकार्याने भविष्यातील के१२ स्टार्टअप असलेल्या गेट सेट लर्न या स्टार्ट अप ने नंदुरबार जिल्ह्यात काम करायला सुरुवात केली.

# डॉ. सुजयदादा विखे पाटील यांचे शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान

पारनेर : (समर्थ गांवकरी)

विखे पाटील परिवार हा फक्त अहिल्यानगरपुरता मर्यादित नसून संपूर्ण देशपातळीवर आपल्या कार्यकर्तृत्वाने परिचित असलेला परिवार आहे. सहकारमहर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, पद्मभूषण मा. खा. बाळासाहेब विखे पाटील, जलसंपदा मंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, अहिल्यानगर जि. प. अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांच्या कार्याचा वारसा मा. खा. डॉ. सुजयदादा विखे पाटील यांनी समर्थपणे पुढे चालविला आहे. असे प्रतिपादन अळकुटी येथील व्यवसायीक तसेच भाजपा मंडलचे कार्यकारिणी सदस्य राहुल नरड यांनी व्यक्त केले आहे.लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथे डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने नारळाच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा, प्राचार्य डॉ. कुंदा कवडे यांनी उपस्थितांचे स्वागत करत डॉ.सुजय विखे पाटील यांच्या सामाजिक कार्याची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी पारनेर भाजपा उपाध्यक्ष अतुल माने, भाजपा मंडल कार्यकारिणी राहुल नरड यांनी या वृक्षारोपण कार्यक्रमाप्रसंगी दोन हजर स्क्वेअर फूटचा ठिबक संच महाविद्यालयास भेट दिला. प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नरड यावेळी म्हणाले प्रवरा मेडिकल ट्रस्ट, विळदघाट, जनसेवा फाऊंडेशन या माध्यमातून त्यांनी अनेक शैक्षणिक समाजपयोगी उपक्रम राबविले आहेत. समाजाला घट्ट जोडून ठेवण्याचे काम त्यांनी केले आहे. एकूणच डॉ. सुजयदादा विखे पाटील यांचे शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. यावेळी पंचायत समितीचे माजी सदस्य दिनेश बाबर, भाजपचे उपाध्यक्ष अतुल माने, संग्राम पावडे,माजी सरपंच भाऊसाहेब डेरे आदींचे भाषने झाली.



# 'औकात के बाहर' मध्ये प्रेम, महत्वाकांक्षा आणि कँपस पॉलिटिक्सचा टकराव




मुंबई : (समर्थ गांवकरी)

ॲमेझॉनची मोफत व्हिडिओ स्ट्रिमिंग सेवा- ॲमेझॉन एमएक्स प्लेयरने आपला आगामी कँपस ड्रामा औकात के बाहर या हृदयस्पर्शी कथानकाची घोषणा केली आहे, जे आपल्याला कोलाहलाने भरलेल्या कँपस जीवनाच्या अस्सल जगात घेऊन जाते. दिल्लीच्या सजीव बॅकड्रॉपवर चित्रीत केलेला हा शो हसू, प्रेमभंग, कँपसमधली दुष्मनी आणि मॉर्डन रोमान्सचा मिलाफ आहे. कॉलेजमधील जीवनाच्या झळाळत्या एनर्जीत हा सामावून घेतो. एल्विश यादवचे प्रमुख भूमिकेतून पदार्पण होत असून औकात के बाहरमध्ये मल्हार राठोड, हेतल गाडा, निखील विजय आणि केशव साधना हे कलाकार देखील महत्वपूर्ण भूमिकांमधून आपल्या भेटीला येत आहेत. एल्विश यादव साकारत असलेल्या राजवीर अहलावतसोबत ट्रेलरची सुरुवात होते, राजवीर हा सफीदों, हरियाणाचा नम्र तरीही प्रखर व्यक्तीमत्वाचा मुलगा आपल्या अवाक्यापलिकडली स्वप्न पाहत दिल्लीच्या उच्चभ्रू कॉलेजमध्ये पाऊल ठेवतो. फ्रेशर पार्टीमध्ये त्याची थट्टा झाल्यावर, तो त्याची सिनियर अंतरा शुक्ला हिला (मल्हार राठोड द्वारे अभिनीत) इंप्रेस करण्यासाठी मागचा पुढचा विचार न करता पैज लावतो. अंतरा शुक्ला आत्मविश्वासू, राजनैतिक प्रभाव असलेली विद्यार्थिनी आहे, जी भावनांना आपल्यापासून मैलभर लांब ठेवते. अविचारी आव्हान लवकरच अधिकाधिक सखोल होत जाते, तसे राजवीरला अभिमान आणि भावनेच्या गुंत्यात अडकल्याचे जाणवू लागते आणि अंतराला ती महत्वाकांक्षा आणि आपुलकीमध्ये गुंतत असल्याचे लक्षात येते.

# iQOO १५ लाँच; अँड्रॉइडचा नेक्स्ट-लेव्हल फ्लॅगशिप स्मार्टफोन

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)




उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड iQOO ने आज या वर्षासाठी त्यांचा प्रीमियम फ्लॅगशिप स्मार्टफोन, iQOO १५ लाँच केला. उत्कृष्ट हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर वैशिष्ट्यांसह सुसज्ज, iQOO १५ हा एक शक्तिशाली फोन आहे जो विशेषतः तरुण व्यावसायिकांसाठी डिझाइन केलेला आहे जे त्यांच्या स्मार्टफोनकडून अधिक अपेक्षा करतात - मग ते कामासाठी असो, सामाजिकीकरणासाठी असो किंवा मनोरंजनासाठी असो. भारतातील फ्लॅगशिप स्मार्टफोनसाठी मानक वाढवत, iQOO १५ मध्ये उद्योगातील सर्वोत्तम Samsung 2K M14 LED OLED डिस्प्ले आहे, जो Android स्मार्टफोनसाठी पहिला आहे.

# अकोल्यात एकल महिलांची उद्योजकता प्रेरणा कार्यशाळा संपन्न

अकोले : (समर्थ गांवकरी)



अकोले तालुक्यातील एकल महिलांची उद्योजकता प्रेरणा कार्यशाळा उमेद अभियान व साऊ एकल महिला समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली.तालुक्यातील व्यवसाय सुरू करण्याची इच्छा असलेल्या ११८ महिला या कार्यशाळेला उपस्थित होत्या.

तालुका मिशन वात्सल्य अभियानाने अशी रोजगार कार्यशाळा एकल महिलांसाठी आयोजित करावे अशी सूचना केली होती. व उमेदच्या राज्य कार्यालयानेही एकल महिलांची कार्यशाळा आयोजन करावी असे आदेशित केले आहे. तालुक्यातील रोजगार करू इच्छिणाऱ्या महिला एकत्र बोलावून त्यांना विविध वक्त्यांनी व्यवसायासाठी प्रेरणा दिली. तालुक्याचे तहसीलदार सिद्धार्थ मोरे व गटविकास अधिकारी अमर माने यांनी या कार्यशाळेचे उद्घाटन केले. तहसीलदार सिद्धार्थ मोरे यांनी महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे, प्रशासन त्यांच्या पाठीशी उभे राहील अशी ग्वाही दिली तर अमर माने यांनी बचत गटाच्या योजनेत एकल महिलाना नेहमीच प्राधान्य दिले जाईल असे सांगितले.उमेद अभियानाचे तालुका व्यवस्थापक कुंदन कोरडे यांनी बचत गटाच्या माध्यमातून मिळणारा निधी व रोजगार सुरू करण्याची प्रक्रिया कर्ज काढण्याची पद्धती याविषयी सविस्तर माहिती लिहून अनेक महिलांच्या व्यवसायांची माहिती दिली. राष्ट्रवादी किसान सभेचे ॲड वसंत मनकर यांनी महिलांनी सामुदायिक उद्योग उभारावेत असे आवाहन केले व त्यांच्या उत्पादनाच्या विक्रीसाठी अकोल्यात विक्री केंद्र उभे करण्याचे अपेक्षा व्यक्त केली. साऊ एकल महिला समितीचे राज्य निमंत्रण हेरंब कुलकर्णी यांनी वेगवेगळ्या ५० उद्योगांची माहिती दिली. एक व्यवसाय नक्की करून लवकरात लवकर व्यवसायाची सुरुवात करावी. अन्न प्रक्रियेशी संबंधित उद्योग निवडावा व स्वतःच्या पायावर उभे राहावे. अकोले तालुक्यातील १००एकल महिलांचे उद्योग सुरू करण्याचा संकल्प त्यांनी जाहीर केला. सेंट्रल बँकेचे व्यवस्थापक शशिकांत डमाळे

यांनी बँकेच्या विविध कर्ज योजना सांगून महिलांना सहकार्य करण्याचे आश्वासन दिले तर कृषी विभागाचे अतुल पवार यांनी कृषी विभागाच्या महिलांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. एकात्मिक बालविकास प्रकल्पाच्या अधिकारी अर्चना एखंडे यांनी प्रार्थना घेतली व महिलांनी नैराश्य झटकून दुःखातून बाहेर येते स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करावे अशी प्रेरणा दिली. साऊ एकल महिला समितीच्या प्रतिमा कुलकर्णी यांनी कार्यशाळेचा समारोप करून ज्या महिला रोजगार सुरू करतील अशा महिलांच्या रोजगारासाठी आम्ही सोबत आहोत असे सांगितले.

यावेळी व्यवसाय करणाऱ्या सीमा भागवत, नीता शिंदे,वैशाली राजगुरू,वंदना सोनवणे,ज्योती नाईकवाडी या महिलांनी आपले यशस्वी उद्योग कसे सुरू केले याची यशोगाथा सांगितली.. एकल महिलेने व्यवसाय सुरू करण्याचा संकल्प करून वात्सल्य समितीच्या सूचनेवरून उमेद ने पुढाकार घेऊन एकल महिलांची राज्यातील ही पहिली कार्यशाळा असेल..त्यामुळे राज्यातील एकल महिलांची अशी कार्यशाळा सर्व वात्सल्य समिती व उमेद चे वतीने राज्यात व्हावी अशी अपेक्षा प्रतिमा कुलकर्णी यांनी व्यक्त केली.



# स्व. मधुकरराव पिचड साहेबांच्या प्रथम पुण्यस्मरणाला राज्यभरातून मान्यवरांची उपस्थिती!

## वैभवराव मधुकरराव पिचड यांच्याकडून सर्वांचे मनःपूर्वक आभार!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

लोकनेते स्व. मधुकरराव पिचड साहेब यांच्या प्रथम पुण्यस्मरण सोहळ्याला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने मान्यवर, कार्यकर्ते, हितचिंतक आणि ग्रामस्थांनी उपस्थित राहून पिचड साहेबांना भावपूर्ण अभिवादन अर्पण केले. उपस्थितीची ही उत्स्फूर्तता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दलच्या आदराचे ज्वलंत प्रतीक ठरली.

साधेपणा, प्रामाणिकपणा, लोकसेवा आणि सर्वसामान्य माणसावरील अपार माया ही स्व. मधुकरराव पिचड साहेबांची जीवनमूल्ये. गावातील एका सर्वसामान्य कुटुंबातून उभे राहून त्यांनी राज्याच्या राजकारणात आणि समाजकारणात अमीट ठसा उमटवला. त्यांच्या जाण्यानंतर निर्माण झालेली पोकळी आजही जाणवते; परंतु समाजसेवेची त्यांची परंपरा आजही सर्वांना प्रेरणा देत आहे. पुण्यस्मरण कार्यक्रमाला राज्यातील विविध जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या मान्यवरांनी पिचड साहेबांविषयीचे प्रेम आणि सन्मान अधोरेखित केला. कार्यकर्ते, ग्रामस्थ, महिला आणि युवा वर्गाने उत्साहाने भाग घेत कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि भावनिक वातावरणात पार पडला.

कार्यक्रमात उपस्थितांना धन्यवाद देताना वैभवराव मधुकरराव पिचड यांनी सांगितले की, "साहेबांची लोकसेवा, त्यांची विचारधारा आणि सर्वसमावेशक भूमिका हीच आमच्यासाठी प्रेरणा आहे. आज येथे उपस्थित राहून ज्यांनी पिचड साहेबांना श्रद्धांजली अर्पण केली, त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो." कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेतलेल्या सर्व कार्यकर्त्यांचेही त्यांनी विशेष आभार मानले. स्व. मधुकरराव पिचड साहेबांची आठवण आणि त्यांची लोकाभिमुख कार्यप्रणाली जपत त्यांच्या विचारांची परंपरा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त करत पुण्यस्मरण कार्यक्रम भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



























